पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला
● वर्ष १६ ●अंक १२ ● शनिवार, दि. १८ जुलै २०२६ ●मूल्य ५ ●पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. http://epaper:citynewssuperfast.com

**सुविचार**

आवड आणि आत्मविश्वास असेल तर कुठलीही गोष्ट अवघड नाही.




# गुटखा फॅक्टरींचा CID तपास होणार का ?

## मुख्यमंत्री गृहमंत्री आदेश देतील का ▶ गुटख्यापेक्षा बनावट गुटखा फॅक्टरी विकत होते विष

### एम आय डी सी पोलिसांची भूमिका कोण तपासणार

राज्यात बंदी असलेला गुटखा थेट अकोल्यात उत्पादित कसा होत होता ? अकोला पोलिसांचे गुप्तचर खाते काय झोपा काढत होते की त्यांचे 'महिन्याचे हप्ते' वेळेवर पोहोचत होते ?. अशी विचारणा नागरीकांद्वारे होत आहे. या कारवाईत मोठे मासे वाचवण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती आहे. एम आय डी सी मध्ये २ बनावट गुटखा फॅक्टरी सुरु असताना बिट जमादार, डी.बी. स्क्वॉड काय करत होते. त्यांना आता पर्यंत सक्तीच्या रजेवर का पाठविले गेले नाही ? अशी विचारणा पोलिस दलातून होत आहे. राज्यात बंदी असलेला गुटख्याची थेट निर्मिती अकोल्यात होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या २ फॅक्टरी केव्हापासून सुरु होत्या याचा ही शोध घेण्याची गरज आहे. इतकेच नाही तर एम आय डी सी मध्ये बारबालाचा सप्लायर कोण ? एम आय डी सी मधील बारमध्ये मुलींना कोण नाचवत होते ? तिथे मुलींचा सप्लाय करणारे रॅकेट कोणाचे आहे ? अशी भिती युक्त चर्चा उद्योग जगतात दबक्या आवाजात सुरु आहे.

### कॉपीराईटचा गुन्हा दाखल का नाही



या फॅक्टरीत नामांकित ब्रँडेड कंपन्यांचे बनावट रॅपर्स आणि हुबेहूब केमिकल युक्त गुटखा तयार केला जात होता. लोकल गुटखा बनवून तो नॅशनल / इंटरनॅशनल ब्रँडच्या नावाखाली विकून कोट्यवधींची उलाढाल सुरू होती. यामुळे मूळ कंपन्यांची झोप उडाली आहे. परंतु, अकोला पोलिसांनी या प्रकरणात अजूनही कॉपी राईट अॅक्ट नुसार कडक गुन्हा दाखल का केला नाही? कोणाला वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे ?

### गोदाम मालकांना वगळण्याच्या हालचाली सुरु

गुटखा माफियांच्या गँगमध्ये अंतर्गत वाद उफाळल्यामुळेच ही माहिती लीक झाली आणि नाईलाजाने ही धाड टाकावी लागली, हे आता उघड गुपित आहे. गौरव शर्मा याने एका ठिकाणी गुटखा फॅक्टरी टाकल्यानंतर त्याने महापालिका कर्मचारी अभिषेक गई यांच्या गोदामात दूसरी फॅक्टरी वडीलांसाठी टाकल्याचे आश्चर्य व्यक्त होत आहे. कि वेळेवर ही फॅक्टरी गोदाम मालकाची न दाखविता वडिलांच्या मालकीची दाखविण्याचा प्रयत्न तर झाला नाही ना. महापालिकेचा कर्मचारी एका राष्ट्रीय पक्षाच्या बड्या नगरसेवकाचा सख्खा भाचा आहे. त्यात या नगरसेवकाच्या पैशांचे व्यवहार तर नाही अशी विचारणा 'आपला सेवक' चे कार्यकर्ते खाजगीत करत आहे. या बनावट फॅक्टरीत 'भाच्याच्या' आडून 'मामा'चे किती पैसा गुंतला होता ? अकोला पोलीस या राजकीय वरदहस्त असलेल्या मामाचा शोध घेण्याचे धाडस दाखवतील, की राजकीय दबावापुढे गुडघे टेकतील ? अशी चर्चा गुटखा माफियांच्या वर्तुळात आहे.



प्रतिनिधी १८ जुलै

अकोला: गोरगरीब जनतेच्या आरोग्याशी खेळणारा आणि खाणाऱ्याला 'कॅन्सर'च्या खाईत लोटणारा एक भयंकर प्रकार नुकताच उघडकीस आला आहे. राज्यात बंदी असलेल्या गुटख्याची थेट निर्मिती करणाऱ्या दोन 'बनावट गुटखा फॅक्टरी' अकोल्यात पकडल्या गेल्या. पण या कारवाईनंतर जे प्रश्न उपस्थित होत आहेत, ते पाहता अकोला पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाचे काही अधिकारी नेमके कोणासाठी काम करतात ? असा संतप्त सवाल जनता विचारत आहे. हा धंदा गुटख्याचा नसून थेट विष विकण्याचा होता !. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सर्व प्रकरणात सी आय डी तपास केल्यास जन आरोग्यासाठी हिताचे होईल. इतकेच नाही तर बनावट गुटखा निर्मितीचे पाळेमुळे खणली जातील. इतकेच नाही तर राज्यातील इतर ही बनावट गुटखा निर्मितीचे बिंग फुटेल.

### केमिकल पुरवणारे कोण? तपास शून्य !

या बनावट गुटख्यात मानवी शरीराला अत्यंत घातक असणारे केमिकल अर्थात विषच वापरले जात होते. हे प्राणघातक केमिकल सप्लाय करणारी एजन्सी कोणती ? आणि या संपूर्ण रॅकेटमध्ये त्या विशिष्ट डॉक्टरची भूमिका काय ? या फॅक्टरीचा इतिहास तपासला तर याचे धागेदोरे थेट बऱ्हाणपूर, मुर्तीजापूर आणि अकोल्यात पसरलेले आहेत. मात्र, हा गुटखा नेमका कोणाकोणाला विकला गेला, याचा तपास अजूनही 'शून्य' आहे !.जप्त केलेल्या केमिकल युक्त गुटख्याच्या सॅम्पलचा तपासणी अहवाल लॅबमधून कधी येणार, की तोही गायब केला जाणार ? अशी विचारणा होत आहे.

### जीएसटी चोरीचा मोठा घोटाळा !

या अवैध धंद्यात कुठलीही नोंदणीकृत फर्म नव्हती. 'शर्मा आणि कंपनी'ने हा सगळा काळाबाजार सुरू केला होता.गौरव शर्मा याची आधीच एक स्वतंत्र फॅक्टरी असताना, त्याने दुसरी बेकायदेशीर फॅक्टरी आपल्या वडिलांसाठी कशी टाकली ?. गुटख्यासाठी लागणारे घातक केमिकल, सुपारी विक्रेते कोण, पाऊच विक्रेते कोण, त्या मशिन्स कुठून आणल्या. बनावट गुटखा निर्मिती करत त्याची विक्री होताना जीएसटी चोरीचे मोठे रॅकेट सक्रिय होते. केंद्राच्या व राज्याच्या महसूलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान केले गेले आहे.

### नव्या एमआयडीसीची गरज काय ?

अकोल्यात असलेल्या एमआयडीसी त अनेक उद्योगांच्या जागेचा वापर रहिवासी कामासाठी होत आहे. नव्या एम आय डी सी च्या स्थापनेपुर्वी असलेल्या एम आय डी सी त कोणते उद्योग सुरु आहे याचा सर्व्हे आवश्यक आहे. त्याच बरोबर बंद उद्योगात असलेल्या गोदामांमध्ये काय काय उद्योग सुरु आहे याचा ही शोध घेण्याची गरज आहे. नुकतेच एका शासकीय मिटिंग मध्ये आमदार हरिश पिंपळे यांनी औद्योगिक वसाहतीमधील गोदामांवर धाडी टाकण्याची मागणी केली होती. त्याचे काय झाले अशी विचारणा आता होत आहे. या सर्व गोष्टींकडे जाणीवपुर्वक डोळेझाक करणाऱ्या एम आय डी सी च्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना घरी पाठविण्यासाठी उद्योग विभाग पावले उचलणार काय. उद्योगांना चालना देण्यासाठी मिळालेल्या सबसिडीतून तिथे उद्योग न उभारता केवळ बेकायदेशीर गोदामे उभारली गेली आहेत. याचा तपास होईल काय.

## » थोडक्यात

### राज्याचा शिरपेचात मानाचा तुरा!



**बारामती :** देशातील सर्वात प्रतिष्ठेच्या आणि स्पर्धात्मक वैद्यकीय प्रवेश परीक्षांपैकी एक असलेल्या नीट (युजी) २०२६ मध्ये बारामतीच्या कन्येने ऐतिहासिक कामगिरी करत संपूर्ण राज्याची मान उंचावली आहे. श्रावणी कृष्णा कुदळे हिने ७२० पैकी तब्बल ७१० गुण मिळवत ऑल इंडिया रँक (एआयआर) ५ क्रमांक पटकावला आहे. एवढेच नव्हे, तर देशातील सर्व मुलींमध्ये प्रथम क्रमांक, ओबीसी (एनसीएल) प्रवर्गात ऑल इंडिया रँक-१ आणि महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक मिळवत तिने यशाचा नवा उच्चांक गाठला आहे. श्रावणीने ९९.९९ टक्के मिळवले आहेत. अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या नीट परीक्षेत देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमधून अव्वल पाचमध्ये स्थान मिळवणे ही मोठी कामगिरी मानली जाते.

### आमिर खान बिश्नोई टोळीकडून लक्ष्य!

मुंबई : सलमान खानला लक्ष्य केल्यानंतर बिश्नोई टोळीने आता आमिर खानला लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत बिश्नोई टोळीचे कथित सदस्य आरझू बिश्नोई आणि टायसन बिश्नोई यांनी आमिर खानला जीवे मारण्याची धमकी दिली आहे. आमिर खानने गौरी स्प्रॅटशी काही दिवसांपूर्वी लग्न केले. त्याचा हा तिसरा विवाह आहे. आमिर खान लव्ह जिहादला प्रोत्साहन देत आहे, असा आरोप करत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. दरम्यान या सोशल मीडिया पोस्टची खातरजमा अद्याप झालेली नाही. तसेच एक कथित ऑडिओ क्लिपही व्हायरल होत आहे.

### 'भारत सरकार' कारमधून गुटखा तस्करी!

**पालघर :** महाराष्ट्रात गुटखा विक्री आणि बेकायदेशीर वाहतुकीविरोधात अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे अॅक्शन मोडवर आले आहेत. तुकाराम मुंढे यांनी राज्यभरात गुटखा माफियांविरोधात धडक मोहीम उघडल्यामुळे तस्करांचे धाबे दणाणले आहेत. या धसक्यातूनच पोलिसांची आणि प्रशासनाची नजर चुकवण्यासाठी गुटखा तस्करांनी एक अत्यंत धक्कादायक शक्कल लढवल्याचा प्रकार पालघरमध्ये समोर आला आहे.

# पोलिसांनी बळजबरीने वांगचुक यांना रुग्णालयात केले दाखल!



वृत्तसंस्था १८ जुलै

**दिल्ली :** दिल्लीतील जंतर मंतर येथे गेल्या २० दिवसांपासून उपोषणावर बसलेल्या प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ सोनम वांगचुक यांना शनिवारी सकाळी (१८ जुलै) पोलिसांनी जबरदस्तीने हटवले. त्यांना रुग्णालयात नेण्यात आल्याचे वृत्त आहे. आता त्यांच्या पत्नी गीतांजली जे. आंगमो यांनी या प्रकरणी भाष्य करत प्रतिक्रिया दिली आहे. सोनम वांगचुक यांच्या रुग्णालयातील दाखल करण्यासंदर्भात, त्या म्हणाल्या की शुक्रवारी त्यांची प्रकृती ठीक दिसत होती. गीतांजली आंगमो यांनी पुढे सांगितले की, कालपर्यंत त्यांची प्रकृती ठीक होती आणि त्यांना रुग्णालयात आणण्याची गरज नव्हती. कलम ३२ अन्वये हा त्यांचा अधिकार आहे की, त्यांच्या आणि त्यांच्या डॉक्टरांच्या परवानगीशिवाय कोणतीही गोष्ट दिली जाऊ शकत नाही. "पोलिसांनी गुंडांसारखं वर्तन केलं आहे. ज्या लोकांना दिल्लीत यायचं आहे, त्यांनी यावं. आम्ही इथेच बसून राहणार आहोत. दिल्ली पोलिसांनी मलाही मारहाण केली आणि जंतर-मंतरवर जाण्यापासून रोखलं. मला मारहाण करण्यात आली, रस्त्यावरुन फरफटत नेलं असं देखील अभिजीत दिपके यांनी सांगितलं.

# 29 महाविद्यालयांवर 'प्रवेश बंदी'

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा मोठा निर्णय




प्रतिनिधी १८ जुलै

**अकोला :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी एक अत्यंत मोठा आणि कडक निर्णय घेतला आहे. विद्यापीठ प्रशासनाने नियमबाह्य कारभार करणाऱ्या तब्बल २९ महाविद्यालयांमध्ये आगामी शैक्षणिक वर्षात नवीन प्रवेश घेण्यावर पूर्णपणे बंदी घातली आहे. विद्यापीठाच्या कुलसचिवांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध झालेल्या अधिकृत 'परिशिष्ट-ब' या यादीनुसार ही धडक कारवाई करण्यात आली आहे.

विद्यापीठ प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, महाविद्यालयांनी आजतागायत या महाविद्यालयांनी आवश्यक पदभरती न केल्यामुळे, विद्यापीठाने अखेर कठोर पाऊल उचलत सत्र २०२६-२०२७ साठी त्यांच्यावर पुन्हा प्रवेश बंदीची कारवाई केली आहे.

प्रवेश बंदी असलेल्या महाविद्यालयांमध्ये अमरावती जिल्ह्यातील महाराष्ट्र कला महाविद्यालय, शिराळा, ता. चांदुर बाजार, स्व. पंचफुलाबाई गुणवंतराव भारसाकळे कला व वाणिज्य महाविद्यालय, सातेगाव, ता. अंजनगाव सूर्जी, श्रीराम कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोर्शी मधुबन महाविद्यालय (कला व वाणिज्य), सावलीखेडा, ता. धारणी,डॉ. एस. एस. गोरडे विज्ञान महाविद्यालय, पथ्रोट, ता. अचलपूर या महाविद्यालयाचा समावेश आहे.

अकोला जिल्ह्यातील गयादेवी जोशी आर्यभट महाविद्यालय केशव नगर, वैदेही विष्णु सराफ महाविद्यालय, हर्ष संकुल, सिव्हील लाईन, गुलाम जैनुल आबोदिन कला महाविद्यालय, वाडेगांव, ता. बाळापुर, मेघे इन्स्टिट्युट ऑफ अॅडव्हान्स स्टडीज, मौजा-कौलखेड, हिंगणा रोड, अकोला, श्री. व्ही. के. जोशी महाविद्यालय, गायगांव, ता. बाळापुर यांचा प्रवेश बंदी असलेल्या महाविद्यालयात समावेश आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालय, बुलढाणा, श्रीरामभाऊ शेळके विधी महाविद्यालय, खामगांव,व्यवसाय प्रशासन महाविद्यालय , आरस लेआउट, बुलडाणा, सत्यजित कॉलेज ऑफ सायन्स, मेहकर,स्व. गजानन माणिकरावजी गावंडे विज्ञान महाविद्यालय, खामगांव ,स्व. गणेश भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, देऊळगांवमही, ता. देऊळगांवराजा,सरस्वती कॉलेज, गौलखेड रोड, शेगांव ,श्रीमती तुलसीबाई रंगलालजी झांबड सिनियर कॉलेज, नांदुरा, आनंदनगर ,श्री. सरस्वती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जानेफळ, ता. मेहकर, श्रीमती बसंतीबाई देवकिसनजी चांडक सहकार कला व वाणिज्य महाविद्यालय, डोंगर खंडाळा, जि. बुलडाणा या महाविद्यालयाचा प्रवेश बंदी असलेल्या महाविद्यालयात समावेश आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील डॉ. बाबासाहेब नांदुरकर शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ,स्व. रुपेशकुमार इंगोले कॉलेज ऑफ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी, यवतमाळ,अनिरूद्ध कॉलेज ऑफ सायन्स, कळंब, श्रीमती सुर्यकांता तेलगोटे महिला महाविद्यालय, धामणगांव रोड, यवतमाळ,श्री. वसंतराव नाईक (रात्रकालीन) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुसद यांचा समावेश प्रवेश बंदी असलेल्या महाविद्यालयात आहे.

वाशिम जिल्ह्यातील आदर्श अध्यापक महाविद्यालय, कारंजा (लाड), सन्मती लॉ कॉलेज, वाशिम, श्री कानीफनाथ महाविद्यालय, खेर्डा, ता. कारंजा, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जांभरुण परांडे, जि. वाशिम या महाविद्यालयाचा समावेश प्रवेश बंदी असलेल्या महाविद्यालयात आहे.

# हायकोर्टाची अवमानना नोटीस

**नागपूर :** कर्मचाऱ्याला न्याय देण्याबाबत कमालीची उदासीनता दाखवण्यात आल्याची बाब विचारात घेता मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने शुक्रवारी अकोला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, लघु पाटबंधारे विभागाचे जिल्हा जलसंवर्धन अधिकारी व अमरावती विभागीय आयुक्त यांना अवमानना नोटीस बजावून येत्या ३१ जुलैपर्यंत स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश दिले. प्रकरणावर न्यायमुर्तिद्वय अनिल पानसरे व रजनीश व्यास यांच्यापुढे सुनावणी झाली.

धनराज मडावी, असे जिल्हा परिषद कर्मचाऱ्याचे नाव आहे. आश्वासित प्रगती योजनेचे लाभ मिळवण्यासाठी त्यांना तिसऱ्यांदा उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागली आहे. पहिल्या याचिकेत न्यायालयाने मडावी यांच्यावरील विभागीय चौकशी रद्द केली होती आणि आश्वासित प्रगती योजनेचे लाभमिळवण्यासाठी प्रशासनाकडे अर्ज करण्याची मुभा दिली होती.

# राज्यात चार शिक्षण संस्थांमध्ये 'क्वांटम तंत्रज्ञान'धडे!

## पुढील वर्षापासून पूर्णवेळ बी.टेक. अभ्यासक्रम, 'मित्रा'चे सीईओ परदेशी यांची माहिती

प्रतिनिधी १८ जुलै

**पुणे :** राज्यातील चार प्रमुख उच्च शिक्षण संस्थांमध्ये यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून 'क्वांटम टेक्नॉलॉजी' हा मुख्य विषय म्हणून सुरू करण्यात येणार आहे. तसेच, पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०२७-२८) पूर्ण वेळचा पदवी (बी. टेक.) अभ्यासक्रम सुरू करण्याचे नियोजन आहे. प्रत्येक संस्थेत 'क्वांटम टीचिंग लॅब' उभारण्यात येणार असून, सध्या उपलब्ध असलेल्या आंतरराष्ट्रीय क्वांटम संगणकांवर विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रशिक्षण देण्यासाठीही निधी मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी दिली.

भारतीय विज्ञान शिक्षण आणि



संशोधन संस्थेत (आयसर पुणे) आयोजित 'एमक्यूटीएम फॅकल्टी डेव्हलमपेंट प्रोग्रॅम इन क्वांटम टेक्नॉलॉजीज' या प्रशिक्षणाच्या समारोप कार्यक्रमानंतर परदेशी यांनी माहिती दिली.'व्हीजेटीआय', 'सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठ', 'व्हीएनआयटी', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ' अशा चार संस्थांमध्ये 'क्वांटम' अभ्यासक्रम सुरू होणार आहे. भारतात अद्याप अद्ययावत क्वांटम तंत्रज्ञानावरील संगणक उपलब्ध नाहीत. त्यामुळे प्राध्यापक, विद्यार्थ्यांसाठी आयबीएम आणि इतर आंतरराष्ट्रीय कंपन्यांची मदत घेण्यात येणार आहे. त्यासाठीचा आवश्यक निधी सर्व सहभागी संस्थांना मंजूर करण्यात आला आहे. प्रत्येक संस्थेत उभारण्यात येणाऱ्या क्वांटम प्रयोगशाळांची तांत्रिक मानके आयसर आणि सी-डॅक यांच्या मार्गदर्शनाखाली निश्चित करण्यात आली आहेत. या तंत्रज्ञानासाठी लागणाऱ्या प्रगत तांत्रिक उपकरणांच्या खरेदीची प्रक्रियाही वेगाने पूर्ण

### हे भविष्यातील अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभ - मुख्यमंत्री

'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सेमीकंडक्टर आणि क्वांटम तंत्रज्ञान हे भविष्यातील अर्थव्यवस्थेचे प्रमुख आधारस्तंभ ठरणार आहेत. या क्षेत्रांसाठी सक्षम मनुष्यबळ तयार करण्यासाठी महाराष्ट्राने व्यापक तयारी सुरू केली आहे. राज्यातील शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि उद्योग यांच्या सहकार्याने क्वांटम तंत्रज्ञानाच्या विकासासाठी सक्षम परिसंस्था (इकोसिस्टीम) विकसित करण्यात येत आहेत.

### निधीची कमतरता भासू देणार नाही - चंद्रकांत पाटील

क्वांटम तंत्रज्ञान हे भविष्यातील अत्यंत महत्त्वा चे क्षेत्र आहे. संशोधन, नवोपक्रम आणि उद्योग क्षेत्राला नवी दिशा देण्याची क्षमता या तंत्रज्ञानामध्ये आहे. राज्यात सक्षम मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी शिक्षकांचे कौशल्यवर्धन, संशोधनाला प्रोत्साहन आणि उद्योग व शैक्षणिक संस्थांमधील समन्वय अधिक बळकट करणे आवश्यक आहे. या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसाठी शासन निधीची कमतरता भासू देणार नाही, असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी नमूद केले.



# अध्यक्ष नेल्सन मंडेला यांचा वारसा अन् मूल्यांचा सन्मान करण्याचा दिवस

## आज आंतरराष्ट्रीय मंडेला दिवस



नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय दिवस (किंवा मंडेला दिवस ) हा नेल्सन मंडेला यांच्या सन्मानार्थ साजरा केला जाणारा वार्षिक आंतरराष्ट्रीय दिवस आहे , जो दरवर्षी १८ जुलै रोजी, मंडेलांच्या वाढदिवसानिमित्त साजरा केला जातो. नोव्हेंबर २००९ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस अधिकृतपणे घोषित केला आणि पहिला संयुक्त राष्ट्र मंडेला दिवस १८ जुलै २०१० रोजी साजरा करण्यात आला. तथापि, इतर गटांनी १८ जुलै २००९ पासून मंडेला दिवस साजरा करण्यास सुरुवात केली.

२७ एप्रिल २००९ रोजी, ४६६६४ कॉन्सर्ट्स आणि नेल्सन मंडेला फाऊंडेशनने जागतिक समुदायाला अधिकृत मंडेला दिनाच्या समर्थनार्थ सामील होण्यासाठी आमंत्रित केले . मंडेला दिवस हा सार्वजनिक सुट्टी म्हणून नाही , तर स्वयंसेवा आणि समाजसेवेद्वारे दक्षिण आफ्रिकेचे माजी अध्यक्ष नेल्सन मंडेला यांचा वारसा आणि त्यांची मूल्ये यांचा सन्मान करण्याचा दिवस आहे. मंडेला दिवस हा एक जागतिक कृतीचा पुकारा आहे, जो या कल्पनेचा गौरव करतो की प्रत्येक व्यक्तीमध्ये जग बदलण्याची आणि प्रभाव पाडण्याची शक्ती असते नेल्सन मंडेला ६७ वर्षे सामाजिक न्यायासाठी लढले आहेत. आम्ही तुम्हाला ६७ मिनिटांनी सुरुवात करण्यास सांगत आहोत. मंडेला यांच्या वतीने जारी केलेल्या निवेदनानुसार, 'जर असा दिवस जगभरातील लोकांना गरिबीशी लढण्यासाठी आणि शांतता , सलोखा आणि सांस्कृतिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी एकत्र आणण्यास मदत करू शकला, तर आम्हाला सन्मान वाटेल.

१८ जुलै २००९ रोजी, मंडेलांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त, मंडेला दिनाच्या पहिल्या जागतिक सोहळ्यानिमित्त, ४६६६४ कॉन्सर्ट्स आणि नेल्सन मंडेला फाऊंडेशनद्वारे शैक्षणिक, कला प्रदर्शन, निधी उभारणी आणि स्वयंसेवक कार्यक्रमांची मालिका आयोजित करण्यात आली होती, ज्याचा समारोप १८ जुलै रोजी रेडिओ सिटी म्युझिक हॉलमधील एका संगीत कार्यक्रमात झाला. नोव्हेंबर २००९ मध्ये, संयुक्त राष्ट्र महासभेने १८ जुलै हा 'नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय दिवस' म्हणून औपचारिकपणे घोषित केला. २०१४ मध्ये, संयुक्त राष्ट्र महासभेने नेल्सन मंडेला पुरस्काराची स्थापना केली, जो मानवतेच्या सेवेसाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्यांच्या कामगिरीला मान्यता देण्यासाठी दर ५ वर्षांनी दिला जाणारा पुरस्कार आहे.


आज, नेल्सन मंडेला दिनानिमित्त, दक्षिण आफ्रिकेच्या एका आदर्श नेत्याचा भारत आणि भारतीयांवर पडलेला सखोल प्रभाव ओळखायला हवा. १९९४ मध्ये भारत-दक्षिण आफ्रिका एकता बैठकीदरम्यान, नेल्सन मंडेला यांनी भारताबद्दल मनापासून कौतुक व्यक्त केलं होतं, ते म्हणाले,'आज आम्ही विजय साजरा करत आहोत आणि आजपासून आम्ही आपल्या लोकांना चांगले आयुष्य देण्याच्या दृष्टीने एक पाऊल उचलणार आहोत, आम्हाला त्याचा अभिमान आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी भारत आणि तेथील जनतेने दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.' त्यांचे कौतुकास्पद शब्द भारतीयांच्या हृदयाला स्पर्श करणारे होते.'नेल्सन मंडेला यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या वर्णद्वेषावर विजय मिळविणारी ती प्रतिष्ठित व्यक्ती आहे. ते मानवाधिकार मिळवून देणारे वकील, आंतरराष्ट्रीय शांतता निर्माता होते. आणि मुक्त दक्षिण आफ्रिकेचे ते पहिले लोकशाही पद्धतीने निवडलेले अध्यक्ष होते. १८ जुलै हा दिवस नेल्सन मंडेला दिवस म्हणून का साजरा केला जातो ते जाणून घेऊयात.

१८ जुलै ही तारीख म्हणजे नेल्सन मंडेला यांचा वाढदिवस. नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय दिवस हा विचार साजरा करतो की प्रत्येक व्यक्तीमध्ये जग बदलण्याची शक्ती आणि प्रभाव पाडण्याची क्षमता असते. म्हणून, त्यांच्या ६७ वर्षांच्या सार्वजनिक सेवेच्या सन्मानार्थ, नेल्सन मंडेला फाउंडेशन आणि ळ.र्. तुम्हाला तुमच्या वेळेतील ६७ मिनिटे इतरांना मदत करण्यासाठी घालवण्यास सांगतात. नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय दिवस, ज्याला मंडेला दिवस म्हणूनही ओळखले जाते, हा क्रांतिकारक नेल्सन मंडेला यांच्या सन्मानार्थ साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय दिन आहे, दरवर्षी १८ जुलै रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा दिवस साजरा केला जातो. हा दिवस अधिकृतपणे संयुक्त राष्ट्रांनी नोव्हेंबर २००९ मध्ये प्रथमच साजरा केला होता.

नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय दिवस दरवर्षी नव्याने अशा व्यक्तीमत्वावर प्रकाश टाकतो ज्याच्या महत्त्वपूर्ण कामगिरीने २० वे शतक बदलले आणि २१ व्या शतकाला आकार दिला. त्यांची मूल्ये आणि दृढनिश्चय, मानवी हक्क, स्वातंत्र्य आणि न्यायासाठी खोल वचनबद्धता यावर प्रतिबिंबित होतात आणि इतरांसाठी प्रेरणा स्त्रोत ठरतात. मंडेला यांनी प्रत्येक जिवंत व्यक्तीच्या योग्य सन्मान आणि समानतेसाठी वकिली केली आणि सर्व सीमा ओलांडून प्रतिबद्धता आणि एकता प्रोत्साहित केली. त्यांच्या समानतेसाठीच्या अथक प्रयत्नांनी दक्षिण आफ्रिकेतील शांततेचा संस्थापक म्हणून त्यांची ओळख जगाला पटवून दिली.

नेल्सन मंडेला दडपशाहीचा प्रतिकार करणारे सत्तेचे प्रतीक ठरले. अशांततेच्या काळात, मंडेलाचा वारसा प्रत्येकाला अपमानापेक्षा सन्मानाची निवड करण्यास, अन्यायाच्या वेळी बोलणे आणि द्वेषापेक्षा क्षमा करण्यास शिकवतो. ते एकदा म्हणाले होते, 'स्वतंत्र असणे म्हणजे केवळ स्वत: मुक्तपणे वावरणे असा मुळीच नाही, तर इतरांच्या स्वातंत्र्याचा आदर आणि सन्मान करत अशा पद्धतीने जगणे होय.' २०१४ मध्ये, नेल्सन् मंडेला पारितोषिक ळर् जनरल असेंब्लीद्वारे स्थापित करण्यात आले मानवतेच्या सेवेसाठी दूर आणि पलीकडे गेलेल्या लोकांच्या कर्तृत्वाला मान्यता देणारा हा पुरस्कार आहे.

# केवळ दीड दिवस शिक्षण घेणारे प्रतिभावंत साहित्यिक!



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा आज स्मृतिदिन

> अण्णा भाऊंच्या गोष्टींत अथवा लिखाणात विनोद नसतो, असं नाही; पण त्यांचा प्रकृतीधर्म आहे गंभीर लेखकाचा. ज्यांन फार भोगलं आहे, सात पडद्यांतून नव्हे, तर समोरासमोर जीवनातल्या क्रूर सत्याचं ज्याला दर्शन घडलं आहे. अशा पोटतिडकीने लिहणाऱ्या साहित्यिकाचा आत्मा त्यांना लाभला आहे. म्हणून साहजिकच त्यांच्या गोष्टी मोठ्या वैशिट्यपूर्ण असतात. म्हणून तत्कालीन सर्व बड्या कथाकारांपेक्षा ते निराळे आहेत. या लेखकाला प्रतिभेचे देणं लाभलं आहे. जीवनात आग ओकणाऱ्या हरतऱ्हेच्या गोष्टींच्या अनुभव त्यांच्या गाठी आहे. त्यांच्या मनात एकप्रकारचा पीळ आहे. ते अन्यायाविरुद्ध बंड उभारणाऱ्या वृत्तीचा पूजक आहे.'

तुकाराम भाऊराव साठे हे अण्णाभाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि प्रतिभावंत लेखक होते. साठे हे हिंदू मातंग समाजामध्ये जन्मलेले होते. त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते. साठे हे सुरुवातीस मार्क्सवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. त्यांनी प्रामाणिक साहित्य लिहिले. दलित म्हटले की, हिंदू मराठा, ब्राह्मण विरोधी असे लेखन असते. देवांना शिव्या देऊन लपून त्यांचीच पूजा करणे असा दुपट्टीपण त्यांच्या कडे नव्हते. त्यांचा हिंदू धर्मावर प्रचंड लोभ होता.श्री हरी विठ्ठलाचे ते भक्त होते. त्यांनी देव मानले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. केवळ दीड दिवस शाळेत जाऊन शिक्षण घेणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर द.न. गव्हाणकर यांनी केले. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमाभागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले. फकिरा या कादंबरीत त्यांनी श्री हरी विठ्ठल यांच्या भक्तीचा महिमा मानला आहे.

अण्णाभाऊ साठेंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव साठे व आईचे नाव वालुबाई साठे होते. साठे हे शाळेत शिकलेले नाही, केवळ दीड दिवस ते शाळेत गेले. त्यांनी शाळा सोडून दिली. त्यांनी दोन लग्न केलीत, त्यांची पहिली पत्नी कोंडाबाई साठे तर दुसरी जयवंता साठे ह्या होत. त्यांना एकूण तीन अपत्ये होती - मधुकर, शांता आणि शकुंतला.

साठे पहिल्यांदा कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित झाले. १९४४ मध्ये दत्ता गवाणकर आणि अमर शेख या शाहिरांच्या सोबत त्यांनी लालबावटा कला पथक स्थापन केले. याद्वारे त्यांनी अनेक सरकारी निर्णयांना आव्हान दिले होते. ते १९४० च्या दशकामध्ये कार्यरत राहिले आणि तेविया अब्राम्स यांच्यानुसार, भारतातील साम्यवादाच्या आधी स्वातंत्र्याच्या नंतरची १९५० च्या दशकातील सर्वात रोमांचक नाटकीय घटना होती. भारतीय स्वातंत्र्यानंतर उच्चवर्णीयांचे भारतावरील शासन त्यांना मान्य नव्हते म्हणून त्यांनी १६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई येथे २० हजार लोकांचा मोर्चा काढला आणि त्या मोर्च्यातील घोषणा होती, 'ये आझादी झूठी है, देश कि जनता भूखी है!' इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशनमध्येही ते एक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व होते, जी भारतीय कम्युनिस्ट पक्षाची एक सांस्कृतिक शाखा होती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये, ज्याने भाषिक विभागातून वेगळे मराठीभाषी राज्य (बॉम्बे राज्य) निर्माण करण्याची मागणी केली होती.

साठे यांनी कमुनिष्ट शिकवणुकींना अनुसरत आपल्या हिंदू मातंग कार्याकडे वळले आणि हिंदू मातंग व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला. यातून त्यांनी जागतिक संरचनांमध्ये समाजाला आणि कामगार वर्गांचे महत्त्व स्पष्ट केले. या काळातील बहुतांश दलित राजकारणी यांचे मतांचे, लेखकांच्या विपरित, साठेंचे कार्य मार्क्सवादाच्या प्रभावाखाली होते. त्यांनी म्हणले आहे की, लेखकांना सध्याच्या सांसारिक व सर्व समाजातील अत्याचारांपासून माझ्या समाजाला मुक्त करणे आणि त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. कारण दीर्घकालीन पारंपरिक श्रद्धांना त्वरित नष्ट केले जाऊ शकत नाही.त्यांचा देवावर विश्वास होता.

**वि.स. खांडेकर**
**साहित्यिक**

# 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना सुधारणांमुळे आणखी दिलासादायक

> शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. राज्याची ग्रामीण अर्थव्यवस्था ही मोठ्या प्रमाणावर शेती व त्यासंबधित पुरक व्यवसायावर अवलंबून आहे. नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ, उत्पादन खर्चात वाढ आणि बाजार भावातील चढ-उतार यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना नव्याने उभारी देण्यासाठी आणि त्यांना आर्थिकरित्या सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026' लागू केली आहे. शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून दिलासा देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना महत्त्वाची ठरत आहे. योजनेंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या विविध लाभांचा आलेख मांडणारा हा लेख....

राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६' हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ही योजना शेतकऱ्यांना कर्जमुक्तीतून आर्थिक सक्षमतेकडे नेणारी ठरणार आहे. राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारी आणि सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक धोरणाचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिली जात आहे.

कर्जमुक्तीचा मूलभूत उद्देश शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणे हा असला, तरी त्यामागील व्यापक विचार अधिक महत्त्वाचा आहे. कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा पतपुरवठ्यास पात्र होतो. नव्याने पीककर्ज उपलब्ध झाल्यामुळे तो वेळेवर बियाणे, खते, औषधे आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करू शकतो. यामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते आणि शेती अधिक सक्षम बनते.

या योजनेची नुकतीच घोषणा करण्यात आली. लाखो शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या या योजनेतून कोणीही पात्र लाभार्थी अटी व शर्तीमुळे वंचित राहू नये, यासाठी लगेच या योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेत आणखी काही महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर करून तिची व्याप्ती अधिक वाढविली आहे. त्यामुळे आता ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित न राहता, अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणारी आणि न्याय्य स्वरूपाची योजना ठरली आहे.

राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी ही योजना राज्याच्या कृषी इतिहासातील महत्त्वपूर्ण निर्णय म्हणून नोंदवली जात आहे. आता नवीन केलेल्या बदलांमुळे या संख्येत वाढ होणार आहे. विशेष म्हणजे, शासनाने केवळ मोठी आर्थिक तरतूद केली नाही, तर सभागृहात जाहीर केलेल्या सुधारणांमुळे योजनेतील काही अटी शिथिल करून अनेक शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्तीचे दरवाजे अधिक व्यापकपणे खुले केले आहेत.

या सुधारणांमधील सर्वात महत्त्वाचा




निर्णय म्हणजे सन 2019 च्या महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी असलेली ५० हजार रुपयांच्या लाभाची मर्यादा पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. यापूर्वी अशा शेतकऱ्यांना नव्या योजनेत मर्यादित लाभ मिळत होता. आता मात्र ही अट रद्द करण्यात आल्यामुळे अशा सर्व पात्र शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा संपूर्ण लाभ मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली असमानता दूर झाली असून शासनाने समान न्यायाची भूमिका अधिक ठळकपणे मांडली आहे.

तितकाच महत्त्वाचा दुसरा निर्णय म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये नवीन कर्ज घेऊन ते वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आली आहे. अनेक शेतकरी या अटीमुळे संभ्रमात होते. शासनाने हा संभ्रम दूर करत नियमित परतफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांनाही दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे योजनेचा लाभ अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक झाला आहे. यापूर्वीच्या घोषणेनुसार, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकीत कर्ज असलेल्या अनेक शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित राहावे लागत होते. नव्या योजनेत हा महत्त्वाचा अडसरही दूर करण्यात आला आहे. आता दोन लाखांपेक्षा अधिक थकबाकी असली, तरी त्यातील दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम शासनाकडून माफ करण्यात येणार आहे.

या योजनेची आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे तिची अंमलबजावणी अत्यंत व्यापक स्वरूपात केली जात आहे. राष्ट्रीयीकृत बँका, व्यापारी बँका, खासगी बँका तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येत आहे. त्यामुळे लाभार्थी निश्चित करण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि अचूकता सुनिश्चित झाली आहे. या योजनेला अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कर्जमुक्तीची रक्कम ही थेट संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. अशा प्रकारे या योजनेला डिजीटल स्वरुप सुध्दा प्राप्त झाले आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ कर्जापुरत्या मर्यादित नसतात. शेतीचा वाढता खर्च, वीज, सिंचन, हमीभाव, बाजारपेठ आणि नैसर्गिक संकटे या सर्वांचा त्यांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम होत असतो. याची जाणीव ठेवून राज्य शासन कृषी क्षेत्रावर दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपये खर्च करीत आहे. केवळ कृषी वीजबिलासाठीच सुमारे २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे. कापूस खरेदीसाठी दहा हजार कोटी रुपयांहून अधिक चुकारे अदा करण्यात आले असून, सोयाबीन खरेदी, कांदा बाजारभाव स्थिरीकरण, ठिबक सिंचनासाठी प्रलंबित निधी आणि कृषी समृद्धी योजनेसाठी अतिरिक्त तरतूद, कृषी फिडरवर दिवसा वीजपुरवठा यांसारख्या निर्णयांतूनही शासनाची शेतकरीहिताची भूमिका स्पष्ट दिसून येते.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही केवळ आर्थिक मदतीची योजना नाही; तर शेतकऱ्यांचा आत्मविश्वास पुन्हा दृढ करण्याचा प्रयत्न आहे. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभारी देणे, त्यांना पुन्हा शेतीकडे आत्मविश्वासाने वळविणे आणि कृषी अर्थव्यवस्थेला बळकटी देणे, हा या योजनेमागील व्यापक दृष्टिकोन आहे.

विधिमंडळ सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले की, या सुधारणांमुळे शासनावर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला, तरी एकही पात्र शेतकरी कर्जमुक्तीपासून वंचित राहू नये, हीच शासनाची भूमिका आहे. ही भूमिका केवळ घोषणांपुरती मर्यादित नसून, त्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक जबाबदारी स्वीकारण्याची शासनाची तयारीही यातून दिसून येते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केवळ आकडेवारीच्या नजरेतून न पाहता त्यांच्या आयुष्याशी निगडित वास्तव समजून घेऊन निर्णय घेण्याची संवेदनशीलता या सुधारणांमधून दिसून येते. त्यामुळे ही योजना आता पूर्वीपेक्षा अधिक व्यापक, अधिक समावेशक आणि अधिक परिणामकारक ठरली आहे.

'शेतकरी समृद्ध तर राज्य समृद्ध' या संकल्पनेला प्रत्यक्ष बळ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६' शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण करणारा महत्त्वाचा निर्णय आहे. कर्जाच्या दुष्टचक्रातून मुक्तता, नव्या गुंतवणुकीची संधी आणि आधुनिक शेतीकडे वाटचाल या माध्यमातून ही योजना राज्यातील कृषी क्षेत्राला नवी दिशा देणारी ठरणार आहे. शासनाच्या या निर्णयामुळे कर्जमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी पाऊल पडल्याची भावना राज्यातील शेतकऱ्यांमध्ये निश्चितच दृढ झाली आहे.

**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

सिटी न्यूज अकोला

शनिवार, दि. १८ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे वाढवा

## माजी उपमहापौर निखीलेश दिवेकर यांची मागणी

प्रतिनिधी १८ जुलै

**अकोला :** अकोला शहरातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी आणि सुरक्षेचा स्तर उंचावण्यासाठी शहरात तातडीने ५०० नवीन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावे, अशी आग्रही मागणी माजी उपमहापौर निखीलेश दिवेकर यांनी केली आहे. या संदर्भातील एक सविस्तर निवेदन त्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. गजेंद्र मालठाणे यांना दिले.

शहराची सद्यस्थिती आणि इतर प्रमुख शहरांची तुलना लक्षात घेता, अकोल्यातील कॅमेऱ्यांची संख्या अत्यंत पुरेशी नसल्याचे या निवेदनातून समोर आले आहे.

निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून, हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा असल्याचे मान्य केले. तसेच, शहराच्या सुरक्षेसाठी लवकरच अतिरिक्त सीसीटीव्ही कॅमेरे मंजूर करण्याचे सकारात्मक आश्वासन त्यांनी शिष्टमंडळाला दिले.निवेदन देताना उपस्थित मान्यवर:यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यासाठी माजी उपमहापौर निखीलेश दिवेकर यांच्यासह सरदार सर, मनीष मिश्रा, माजी सरपंच राजेश मते, काँग्रेस पूर्व ब्लॉक अध्यक्ष विनोद नालट, सुनील चंदनबटवे, रेहमान बाबू, दत्ता आमले आणि महादेव मेहंगे प्रामुख्याने उपस्थित होते.




### संवेदनशील हा डाग पुसेल

अकोला शहराला लाभलेला 'संवेदनशील शहर' हा डाग कायमचा पुसून टाकायचा असेल, तर शहरावर आधुनिक कॅमेऱ्यांची नजर असणे गरजेचे आहे. जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून हे ५०० कॅमेरे विविध महत्त्वाच्या व गर्दीच्या ठिकाणी बसवण्यात यावेत.'

**निखीलेश दिवेकर** (माजी उपमहापौर)

### अकोल्यातील धक्कादायक वास्तव

माहिती अधिकारातून मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, अकोला शहराचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ५० चौरस मैल आहे. मात्र, संपूर्ण शहरात सार्वजनिक ठिकाणी फक्त १९७ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत. म्हणजेच, सरासरी काढल्यास प्रति चौरस मैलात केवळ ४ कॅमेरे येतात, जे सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत चिंतेचे आहे. इतर शहरांच्या तुलनेत अकोला कुठे आहे ? अशी विचारणा आता होत आहे. 'एसबीआय'ने केलेल्या एका ताज्या अभ्यासानुसार, ज्या शहरांमध्ये सीसीटीव्हीचे जाळे घट्ट आहे, तिथे गुन्हेगारीचे प्रमाण खूप कमी आहे आणि गुन्हेगार पकडण्याचे प्रमाण जास्त आहे.

# अकोट शहर पोलिसांची फटाके फोडणाऱ्या 20 बुलेटवर कारवाई



वि. प्रतिनिधी १८ जुलै

**अकोट :** शहरात बुलेट मोटारसायकलींना नियमबाह्य पद्धतीने मॉडिफाईड सायलेन्सर बसवून फटाक्यांसारखा मोठा आवाज करणाऱ्या वाहनचालकांविरोधात कोट शहर पोलिसांनी गुरुवारी (दि. 16) धडक कारवाई केली. विशेष वाहन तपासणी मोहिमेदरम्यान अशा 20 बुलेट मोटारसायकलींवर कारवाई करण्यात आली असून, वाहनांवर बसविण्यात आलेले मॉडिफाईड सायलेन्सर जप्त करण्यात आले आहेत.

अकोट शहर हद्दीत काही वाहनचालकांकडून बुलेट मोटारसायकलींच्या मूळ सायलेन्सरमध्ये बदल करून मोठा आवाज करणारे सायलेन्सर बसविले जात असल्याच्या तक्रारी पोलिस प्रशासनाकडे प्राप्त होत होत्या. या सायलेन्सरमुळे वाहन चालविताना फटाक्यांसारखा कर्णकर्कश आवाज निर्माण होत असून, नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. तसेच यामुळे ध्वनी प्रदूषणात वाढ होऊन सार्वजनिक शांतता भंग होत असल्याचे निदर्शनास आले होते.

या पार्श्वभूमीवर अकोट शहर पोलिसांनी विशेष वाहन तपासणी मोहीम राबविली. शहरातील प्रमुख चौक, रस्ते व गर्दीच्या ठिकाणी वाहनांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान 20 बुलेट मोटारसायकलींमध्ये नियमबाह्य पद्धतीने बदल केलेले सायलेन्सर बसविण्यात आल्याचे आढळून आले. त्यानंतर संबंधित वाहनधारकांविरोधात मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच वाहनांवरील मॉडिफाईड सायलेन्सर जप्त करण्यात आले.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक अर्जित चांडक, अपर पोलिस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, सहाय्यक पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी निखील पाटील आणि अकोट शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार किशोर जुनघरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक निलेश बारहाते, पोलीस उपनिरीक्षक समाधान मिसाळ, पोलीस उपनिरीक्षक अविनाश मोहिते, वाहतूक अंमलदार शशिकांत इंगळे तसेच पोलीस कर्मचारी निकेश सोळंके व वैभव वसू यांनी सहभाग घेतला.

# आरोग्य विभागाची व्यापक मोहीम, राणापूरमध्ये पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया

प्रतिनिधी १८ जुलै



**अकोला :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जलजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन अकोला जिल्हा आरोग्य विभागाने पिण्याच्या पाण्याच्या शुद्धीकरणासाठी व्यापक मोहीम हाती घेतली आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक आणि आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून जनजागृती व प्रत्यक्ष उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

या मोहिमेत गावातील सर्व पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत निर्जंतुक करण्यात येत असून, पाण्याची ओटी (ऑर्थो टोलिडीन) चाचणी नियमित केली जात आहे. पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या परिसरात स्वच्छता राखण्याबाबत सरपंच व ग्रामसेवकांना लेखी सूचना देण्यात येत आहेत. तसेच विरंजक (ब्लिचिंग) चूर्णाचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवणे, त्याची योग्य साठवण करणे आणि दर्जा कायम राखण्यासाठी प्रतवारी तपासणीसाठी नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात येत आहेत. जलसुरक्षकांना पाणी शुद्धीकरणाची योग्य पद्धत, क्लोरीनेशनचे प्रमाण आणि सुरक्षित पाणीपुरवठा याबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात येत आहे. पावसाळ्यात जलजन्य आजारांची कोणतीही साथ उद्भवू नये, यासाठी आरोग्य विभाग सर्वतोपरी दक्षता घेतली जात आहे.

याच मोहिमेचा एक भाग म्हणून अकोट तालुक्यातील मौजे राणापूर येथे जलसुरक्षकांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करून पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी आरोग्य सेवक शिवसिंग राजपूत, आरोग्य सेवक अक्षय जराळे तसेच जलसुरक्षक संजय भाऊ मावसकार यांनी सक्रिय सहभाग घेत ग्रामस्थांच्या सुरक्षित पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी केली.

# राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत अंचल काळपांडे ठरली रँक 'सुपर स्टार'




**पातूर :** संभाजीनगर येथे ५ जुलै रोजी जी-चॅम्प अबॅकस अँड ब्रेन जिमतर्फे आयोजित राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत पातूर येथील एज्युविला पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी अंचल अतुल काळपांडे हिने उत्कृष्ट कामगिरी करत रँक "सुपर स्टार" हा बहुमान मिळवून पातूर शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

स्पर्धेनंतर संभाजीनगर येथील एम.आय.टी.कॉलेज मंथन हॉल येथे आयोजित पुरस्कार वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते अंचल हिला प्रशस्तीपत्र, ट्रॉफी व पदक देऊन गौरविण्यात आले. अबॅकस ही बुद्धिमत्तेला चालना देणारी तसेच स्मरणशक्ती, एकाग्रता आणि गणितीय कौशल्य विकसित करणारी स्पर्धा मानली जाते. अंचलने आपल्या मेहनत, चिकाटी आणि जिद्दीच्या बळावर ही उल्लेखनीय कामगिरी करत एज्युविला पब्लिक स्कूलचे नाव राज्यभर उज्ज्वल केले. अंचलच्या या यशाबद्दल पातूर शहरासह परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या यशाचे श्रेय तिने संचालिका सौ. मिताली काळपांडे, विलास काळपांडे आदींना दिले.

# राष्ट्रनिर्मितीसाठी युवकांना संघटित करण्याचा निर्धार

**अकोट :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त "आर एस एस 100 वर्ष – राष्ट्रनिर्माता वर्ष" या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून अकोट खंड व नगराच्या वतीने 19 जुलैला युवा संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री नरसिंग महाराज सभागृह, अकोट येथे दुपारी 3 ते सायंकाळी 6 या वेळेत हा कार्यक्रम होणार असून 16 ते 35 वर्षे वयोगटातील युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त युवकांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि राष्ट्रनिर्मितीची भावना जागृत करण्याच्या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजजीवनातील विविध क्षेत्रांत युवकांची भूमिका अधिक प्रभावी होण्यासाठी मार्गदर्शन तसेच वैचारिक प्रबोधन या संमेलनातून करण्यात येणार आहे.

संमेलनात अकोला विभाग प्रचारक दीपक बडमे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून ते संघाच्या शताब्दी वर्षाचे महत्त्व, राष्ट्रनिर्मितीतील युवकांचे योगदान आणि वर्तमान सामाजिक आव्हानांवर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच अकोट नगर कार्यवाह नितीन शेगोकार हेही युवकांना संबोधित करणार आहेत.

अकोट शहर व परिसरातील युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ खंड कार्यवाह योगेश दाभाडे यांनी केले आहे

# गोसावी समाजातील गुणवंतांचा सत्कार 2 ऑगस्ट रोजी

**अकोला :** गोसावी समाज मंडळ उमरी अकोला चे वतीने दशनाम गोसावी समाजातील गुणवंत विद्यार्थी, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच गणमान्य व्यक्तींच्या सत्काराचे आयोजन रविवार दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी बारा वाजता डीएव्ही कॉन्व्हेंट स्कूल आर्य समाज मंदिर ओपन थिएटर समोर अकोला येथे करण्यात येत आहे.

त्याकरिता इयत्ता दहावी, बारावी, पदविका, पदवी परीक्षा वर्ष २०२६ मध्ये ६० टक्के व अधिक गुणांनी उत्तीर्ण विद्यार्थी तसेच स्पर्धा परीक्षा, खेळ यामध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थी यांनी पत्त्यासह गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत मंडळाचे अध्यक्ष दिलीप पुरी, कल्पदीप निवास गायत्री नगर मोठी उमरी या पत्त्यावर २५.७.२०२६ पर्यंत पाठवावी. या कार्यक्रमास गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक तसेच दशनाम गोसावी समाज बंधू-भगिनींनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मंडळाने एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केले आहे. अधिक माहितीसाठी दिलीप पुरी ९९२१५४७५२, विष्णु गिरी ८८८८८२०३७, विलास भारती ९४२३४२९१७५ यांच्याशी संपर्क साधा असे आवाहन केले आहे.

# प्रवीण रोकडे यांची केंद्रप्रमुखपदी नियुक्ती



प्रतिनिधी १८ जुलै

**मूर्तिजापूर :** जिल्हा परिषद शाळा रामटेकचे मुख्याध्यापक प्रवीण रोकडे यांची अकोला जिल्हा परिषद शिक्षण विभागात किनखेड केंद्राचे केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासकीय क्षमता आणि नेतृत्वगुणांची दखल घेत किनखेड केंद्राची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे. त्यांच्या निवडीमुळे केंद्रांतर्गत येणाऱ्या शाळांच्या शैक्षणिक विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास शिक्षण विभागातील अधिकारी आणि शिक्षक व्यक्त करीत आहेत.

# माझ गाव आरोग्य संपन्न गाव

## अभियानांतर्गत बाभुळगाव येथे ५० नागरिकांची तपासणी

प्रतिनिधी १८ जुलै

**अकोला :** जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्या नियोजनातून "माझ गाव आरोग्य संपन्न गाव अभियान" प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत कीटकजन्य आजार नियंत्रण, असंसर्गजन्य आजार नियंत्रण, माता-बाल आरोग्य सेवा, स्वच्छता, पोषण, पाणी शुद्धीकरण, आरोग्य शिक्षण आदी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

या अभियानाचाच एक भाग म्हणून मौजे बाभुळगाव, ता. अकोला येथे ईसीजी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात एकूण ५० नागरिकांची ईसीजी तपासणी करण्यात आली.



तपासणीदरम्यान ४ नागरिकांमध्ये इस्केमिया, १ नागरिकामध्ये क्रिटिकल स्वरूपाची हृदयविकाराची शक्यता, तर १ नागरिकामध्ये एलव्हीएच अशी निष्कर्षात्मक नोंद आढळून आली. संबंधित नागरिकांना पुढील वैद्यकीय उपचार व तज्ज्ञांचा सल्ला घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी उपस्थित नागरिकांना सविस्तर आरोग्य शिक्षण देण्यात आले.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. रुपाली पवार (वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र पळसो), डॉ. अरुणा भगत (सीएचओ), आशा सेविका विशाखा, शोभा ताई, गट प्रवर्तक मीनल देशमुख, स्टेमी इंजिनिअर आशिष तयडे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# अडगाव परिसरात सोयाबीनला हवा चांगला पाऊस



**अडगाव बु. :** या भागात सोयाबीन पिकांची वाढ पाहुन बळीराजाच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे. मात्र हिच स्थीती टिकवून ठेवण्यासाठी एखाद्या पावसाची आवश्यकता आहे. सध्या तापमान वाढीमुळे पिकांवर परिणाम होत आहे. त्यामुळे एखादा चांगला पाऊस पिकांच्या वाढीसाठी पोषक ठरू शकतो.

१६ जुलै नंतर विदर्भातील काही भागात पाऊस होण्याची शक्यता आहे. तसे झाले तर पिके छान बहरतील. कारण खरीप हंगामावर शेतकऱ्यांची मदार आहे. शेतकरी सध्या आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत.

# शिक्षण आपल्या दारी, डॉ. एच. एन सिन्हा महाविद्यालयाचा प्रशंसनीय उपक्रम

प्रतिनिधी १८ जुलै

**आलेगाव :** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित डॉ. एच. एन.सिन्हा कला व वाणिज्य महाविद्यालय पातुर आयोजित "शिक्षण आपल्या दारी" या उपक्रमांतर्गत 15 जुलैला सायंकाळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण खंडारे यांच्या संकल्पनेतून तालुक्यातील आलेगाव या ठिकाणी गावातील सरपंच,पोलीस पाटील, प्रतिष्ठित नागरिक, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आदर्श शेतकरी पुरस्कार प्राप्त विश्वासराव खुळे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण खंडारे यांनी प्रास्ताविक केले.

वाणिज्य विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.रोनील आहाले यांनी पी.पी.टी च्या माध्यमातून महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीचा आलेख मांडला. आलेगाव परिसरातील दहावी आणि बारावी च्या परीक्षेमध्ये गुणवंत ठरलेल्या प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमाणपत्र आणि पदक देऊन करण्यात आला.



अध्यक्षीय भाषणामध्ये विश्वासराव खुळे यांनी महाविद्यालयाच्या या प्रशंसनिय उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. दिपाली घोगरे यांनी केले तर आभार प्रदर्शन आय क्यू ए.सी. समन्वयक डॉ. संजय खान्देल यांनी केले. याप्रसंगी देवानंद तायडे माजी मुख्याध्यापक, बाळू पाटील, भास्करराव शेवलकार, दिनकरराव महल्ले, कादिर भाई (पत्रकार) मोहम्मद इम्रान पत्रकार, सलीम, निलेश कापकर, डॉ. व्ही. जी. वसु, डॉ. राठोड प्रा.हर्षद एकबोटे, डॉ. चंद्रकांत धुमाळे, प्रा. विशाल सुरपाम यांची विशेष उपस्थिती होती.

# अग्रसेन चौक ते दुर्गा चौक मार्गावरील दोन्ही बाजूचे अतिक्रमण काढले

## रस्त्याच्या कडेला केलेले अस्थाई शेड हटवले

प्रतिनिधी १८ जुलै

**अकोला :** अग्रसेन चौक ते दुर्गा चौक रस्त्याच्या दुतर्फा विक्रेत्यांनी केलेले अतिक्रमण आज काढले. महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई केली. काही ठिकाणचे अतिक्रमण काढण्यासाठी जेसीबीचा वापर केला.

अग्रसेन चौकापासून दुर्गा चौका पर्यंत अस्थाई विक्रेत्यांनी अतिक्रमण केले होते. जिल्हा स्त्री रूग्णालया समोर शेड उभारण्यात आले होते. ते जेसीबीच्या सहाय्याने काढण्यात आले. वजीफदार पेट्रोलपंपा पासून दोन्ही बाजूला अतिक्रमण केले होते. जिल्हा स्त्री रूग्णालय परिसरात वाहन काढणे अशक्य होते.



एखाद्या वाहनामुळे वाहतूकीचा खोळंबा व्हायचा. परंतु आज हा रस्ता मोकळा दिसला. परंतु या भागात नव्याने अतिक्रमण होणार नाही याची खात्री देता येत नाही.

# एसआयआर मतदार गणनेची मुदत वाढवा

## अवामचे मो.इस्माईलभाई टिव्हीवाले यांच्या नेतृत्वात निवेदन

प्रतिनिधी १८ जुलै

**अकोला :** अकोल्यातील रहिवासी आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मो. इस्माईल भाई (टिव्हीवाले) हबीबभाई कच्छी यांच्या नेतृत्वात स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला एक महत्त्वाचे निवेदन सादर केले आहे. या निवेदनात त्यांनी 'एसआयआर' मतदार गणनेचे फॉर्म भरण्याची अंतिम तारीख ६ महिन्यांसाठी पुढे ढकलण्याची आणि फॉर्ममधील जाचक अटी शिथिल करण्याची जोरदार मागणी केली आहे.

या योजनेचे फॉर्म भरण्याची शेवटची तारीख ८ ऑगस्ट २०२६ निश्चित करण्यात आली आहे. महापालिका निवडणूक जिंकून आलेल्या लोकप्रतिनिधींना त्यांचे 'जात वैधता प्रमाणपत्र' जमा करण्यासाठी प्रशासनाकडून ६ महिन्यांची सवलत (मोहतत) दिली जाते. मग तोच न्याय सर्वसामान्य अवामला का नाही ? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. जनतेला आवश्यक कागदपत्रे आणि प्रमाणपत्रे गोळा करण्यासाठी आणखी ६ महिन्यांचा वेळ मिळायलाच हवा, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. जन्म-मृत्यू विभागाची अधिकृत वेबसाईट अनेकदा डाऊन असते. यामुळे लोकांना दाखले आणि कागदपत्रे मिळवण्यात प्रचंड परेशानी आहे. प्रशासनाने यावर तात्काळ तोडगा काढून अटी सोप्या कराव्यात. ज्या नागरिकांच्या कागदपत्रांमध्ये नावाच्या चुका होत्या आणि त्यांनी कायदेशीररीत्या गॅझेट (राजपत्र) करून नाव दुरुस्त केले आहे, त्यांचे गॅझेटनुसार असणारे नाव फॉर्ममध्ये वैध मानले जावे. निवडणूक आयोगाने गॅझेट केलेल्या नावांना मान्यता न देणे ही थेट जनतेसोबत नाइंसाफी आहे.



सध्या फॉर्म भरण्याची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू असून, कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यास वेळ लागत आहे. त्यामुळे ८ ऑगस्ट २०२६ ही अंतिम तारीख वाढवून पुढील ६ महिने करण्यात यावी. या जाचक अटींमुळे आणि कमी वेळेमुळे अकोल्यातील अवाममध्ये प्रचंड नाराजी आणि चिंतेचे वातावरण आहे.

# 16 घरफोड्यांचा पर्दाफाश

## दोन सराईत चोरटे जेरबंद, 15.68 लाखांचा ऐवज हस्तगत

प्रतिनिधी १८ जुलै



**यवतमाळ :** जिल्ह्यातील वाढत्या घरफोडीच्या घटनांवर आळा घालण्यात स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश आले असून, 16 गुन्ह्यांची उकल करत दोन सराईत चोरट्यांना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, घरफोडीसाठी वापरण्यात येणारी साधने आणि मोटारसायकल असा एकूण 7 लाख 78 हजार 757 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या मुद्देमालाची आजच्या बाजारभावानुसार किंमत 15 लाख 68 हजार 710 रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

यवतमाळ शहर व परिसरात वाढत्या घरफोडी आणि मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा समांतर तपास करून आरोपींना जेरबंद करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक सतत गस्त घालत होते.

दरम्यान, बाभूळगाव ते करळगाव घाट मार्गावर विना क्रमांकाच्या पॅशन प्रो मोटारसायकलवर दोन संशयित इसम तोंडाला कापड बांधून यवतमाळच्या दिशेने जात असल्याची माहिती पथकाला मिळाली. पोलिसांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना अडविले. चौकशीत त्यांनी आपली नावे सागर उर्फ राजरतन पवार (वय 35, रा. शिवाजीनगर, चांदूर रेल्वे, जि. अमरावती) आणि विजयसिंग मानसिंग पवार (वय 25, रा. तरोडा, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती) अशी सांगितली.

त्यांच्या ताब्यातील दुचाकीबाबत समाधानकारक उत्तर न मिळाल्याने पोलिसांनी पंचांसमक्ष बॅगेची झडती घेतली. त्यामध्ये 108.61 ग्रॅम सोन्याचे दागिने, 234 ग्रॅम चांदीचे दागिने, 89 हजार 300 रुपये रोख, तसेच पेचकस, पेंचीस, लोखंडी हुक, टॉर्च आदी घरफोडीसाठी वापरले जाणारे साहित्य आढळून आले. पोलिसांनी तात्काळ सर्व मुद्देमाल जप्त केला. सखोल चौकशीत आरोपींनी यवतमाळ शहर, अवधूतवाडी, लोहारा, बाभूळगाव, दारव्हा, आर्णी आणि दिग्रस परिसरात घरफोड्या केल्याची कबुली दिली. त्यावरून यवतमाळ शहर पोलीस ठाण्याचे 3, अवधूतवाडीचे 6, लोहाराचे 2, बाभूळगावचे 2 तसेच दारव्हा, आर्णी आणि दिग्रस येथील प्रत्येकी 1 असे एकूण 16 गुन्हे उघडकीस आले. यामध्ये 15 घरफोडी आणि एका जबरी चोरीच्या गुन्ह्याचा समावेश आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि सागर इंगळे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार अजय डोळे, प्रशांत हेडाऊ, रुपेश पाली, निलेश राठोड, रितुराज मेढवे, सुनील पैठणे, प्रतीक नेवरे, देवेंद्र होले आणि आकाश सूर्यवंशी यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## जोडमोहा येथे मुंडण आंदोलन

प्रतिनिधी १८ जुलै

**जोडमोहा :** मागील पाच वर्षात जोडमोहा येथे विकास कामे झाली नसल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी शुक्रवारी ग्रामपंचायत कार्यालयासमोर मुंडण आंदोलन केले. ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे विविध प्रश्न निर्माण झाले असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. जलजीवन मिशन योजनेचा बोजवारा उडाला आहे. महामार्गाचे काम अत्यंत संथगतीने आहे. प्रशासनाच्या उदासीन कारभाराचा आणि निष्क्रियतेचा यावेळी निषेध नोंदविण्यात आला.

आंदोलनात कैलास लिलारे, रवी दवारे, पवन जाधव, प्रवीण ढाकुलकर, सागर नेवारे, गणेश कुकुलवार, प्रशांत भोयर, नीलेश तेलंग, सचिन तेलतुंबडे, नागेश ढाकूलकर, गणेश राजूरकर, सागर चव्हाण, वंश शर्मा, सागर पाठक, रोहित बंधाटे, नाना आडे, भूषण जाधव, हरीश चौधरी, कृष्णा पुसनाके, पंढरी पाटे आदी सहभागी झाले होते.

कळंब येथील पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता प्रशांत इंगोले, जोडमोहाचे ग्रामपंचायत अधिकारी महेश इंगोले, ग्रामपंचायत सरपंच प्रशासक सुनंदाताई मुरकुटे, उपसरपंच मारुती गायकवाड, यवतमाळ ग्रामीण चेठाणेदार प्रवीण मानकर, जोडमोहा बिट जमादार सचिन डहाके आदींनी आंदोलनकर्त्यांचे प्रश्न जाणून घेतले.

# जनहिताच्या मागण्यांसाठी राळेगावात काँग्रेसचे धरणे आंदोलन




प्रतिनिधी १८ जुलै

**राळेगाव :** अयोध्या येथील श्रीराम मंदिरातील चोरीची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, शेतकऱ्यांची पीककर्जे सरसकट माफ करावीत, दुबार पेरणीसाठी आर्थिक मदत द्यावी तसेच स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया तातडीने थांबवावी, या प्रमुख मागण्यांसह विविध जनहिताच्या प्रश्नांसाठी राळेगाव तालुका काँग्रेस कमिटी आणि शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवारी (१७ जुलै) तहसील कार्यालयासमोर निषेध व धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

माजी शिक्षणमंत्री प्रा. वसंत पुरके यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रफुल्ल मानकर, काँग्रेस ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष अरविंद वाढोणकर, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष राजेंद्र तेलंगे आणि शहर काँग्रेसचे अध्यक्ष प्रदीप ठुने यांची प्रमुख उपस्थिती होती.

आंदोलनकर्त्यांनी राज्य व केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि जनहिताशी संबंधित प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली. अयोध्या येथील श्रीराम मंदिरातील चोरीप्रकरणी निष्पक्ष चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली.

यावेळी ॲड. सीमाताई तेलंगे, डॉ. नरेंद्र इंगोले, मिलिंद इंगोले, शशांक केंढे, प्रकाश पोपट, महादेव मेश्राम, मारोती पढाल, अंकुश मुनेश्वर, अंकित कटारिया, विवेक झाडे, किशोर धामंदे, श्रीधर थूटूरकर, हमीदभाई पठाण, सुनील भामकर, अशोक टिपरे, मंगेश राऊत, मधुकर राजुरकर, शुभम चिडाम, दिलीप वारेकर, बाळासाहेब दरणे, मनोज पेंदोर, राजेंद्र नागतुरे, बंडू वेले, सचिन उरकुडे, कमलेशसिंह गहलोत, धवल घुगरुड, राहुल कुडमते, विलास वादाफळे, स्वाती मेश्राम, बेबीताई मेश्राम, सैय्यद लियाकत अली, माया कोडापे, ललिता उईके, सुगंधा रामगडे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## पिंपळशेंडा येथे वृद्धाची आत्महत्या

प्रतिनिधी १८ जुलै

**कळंब :** तालुक्यातील पिंपळशेंडा येथील एका वृद्ध इसमाने घराच्या मागे असलेल्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी सायंकाळी ५:३० वाजता उघडकीस आली.

शामराव सोनबा जुनगरे (वय ६८) असे मृताचे नाव आहे. तो स्वमालकीची सात एकर शेती करीत होता.

मागील काही वर्षांपासून शेतीत नुकसान होत असल्याने त्याने आत्महत्या केल्याचे सांगितले जाते. गळफास घेतला, त्यावेळी घरी कुणीच नव्हते. पत्नी, मुलगा व सून मजुरीसाठी शेतात गेले होते. गावातील मुलांना शामराव गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले.

# एसटीच्या बायपास मार्गाविरोधात संताप

## जुना मार्ग पूर्ववत करण्याची मागणी, आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १८ जुलै

**दिग्रस :** दिग्रस शहरातून धावणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बससेवेबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील अंतर्गत मार्गाचे काम पूर्ण होऊनही पुसद–दिग्रस मार्गावरील तसेच अन्य लांब पल्ल्याच्या बहुतांश बसेस अद्याप बायपास मार्गाने धावत असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. जुना मार्ग तातडीने पूर्ववत सुरू करावा, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

नागपूर–नांदेड राज्य मार्गावरील महत्त्वाचे शहर असलेल्या दिग्रस बसस्थानकावर अनेक लांब पल्ल्याच्या बसेस नियमित थांबत नसल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे. त्यामुळे प्रवाशांना अतिरिक्त प्रवास, वेळेचा अपव्यय आणि खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

पूर्वी छत्रपती शिवाजी महाराज चौक, शंकर टॉकीज आणि देवनगर मार्गे धावणाऱ्या बसेस शहराच्या मध्यवर्ती भागातील नागरिकांसाठी मोठा आधार होत्या. मात्र सध्या बहुतांश बसेस बायपासने जात असल्याने व्यापारी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरातील व्यापारी व्यवहारांवरही त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. याशिवाय नागपूर, अमरावती, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर आदी भागांतून पुसदकडे जाणाऱ्या काही पारंपरिक बसफेऱ्या बंद झाल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांचीही गैरसोय वाढली आहे.

दिग्रस आगार प्रशासनाने सर्व चालक-वाहकांना सूचना देऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक–शंकर टॉकीज–देवनगर मार्गावरील बससेवा पूर्ववत सुरू करावी, तसेच दिग्रस बसस्थानकावर सर्व लांब पल्ल्याच्या बसेसना नियमित थांबा देण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास प्रवासी, व्यापारी आणि नागरिकांच्या सहभागातून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनाची जबाबदारी एसटी प्रशासनाची असेल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# सेवा हीच ईश्वरपूजा भावनेतून वैद्यकीय सेवकांचा गौरव ज्येष्ठ डॉक्टरांचा 'सेवा सन्मान सोहळा'

प्रतिनिधी १८ जुलै



**उमरखेड :** सेवा हीच ईश्वरपूजा या उदात्त भावनेने प्रेरित होऊन गेली अनेक वर्षे निरपेक्षपणे मानवसेवा करणाऱ्या शहर व तालुक्यातील ज्येष्ठ डॉक्टरांचा सेवा सन्मान सोहळा रविवारी आर्यवैश्य भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यात वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ. गंधेवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विनोद ग्यानचंदानी व डॉ. सारिका देशमुख यांची उपस्थिती लाभली.

शहर व तालुक्यातील मोठ्या संख्येने डॉक्टर उपस्थित होते. सर्व ज्येष्ठ डॉक्टरांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे वैद्यकीय क्षेत्रातील सेवाभावी कार्याला नवी प्रेरणा मिळत असल्याची भावना व्यक्त केली. यशस्वीतेसाठी उमरखेड डॉक्टर अमरावती येथील वरिष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. सतीश अग्रवाल यांनी डॉक्टरांच्या दैनंदिन जीवनातील स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. वैद्यकीय व्यवसायातील ताणतणाव, मानसिक संतुलन, रुग्णसेवेतील समर्पण आणि स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण विचार मांडले.

असोसिएशन सन्मान टीमने परिश्रम घेतले. अध्यक्ष डॉ. गजानन कोडगिरवार, सचिव डॉ. प्रफुल्ल भानेगावकर, उपाध्यक्ष डॉ. सुप्रिया नरवाडे, कोषाध्यक्ष डॉ. पांडुरंग मुलगीर यांनी आयोजनाची धुरा सांभाळली. संचालन डॉ. मंगेश नरवाडे यांनी केले.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य; महागाव पोलिसांकडून शाळा वाहनचालकांना नियमांचे धडे

प्रतिनिधी १८ जुलै



**महागाव :** नवीन वाहतूक नियमांची प्रभावी अंमलबजावणी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाच्या पार्श्वभूमीवर महागाव पोलीस ठाण्यात शुक्रवारी (१७ जुलै) शासकीय व खासगी शाळांच्या वाहनचालकांची विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देत निष्काळजीपणा महागात पडू शकतो, असा इशारा पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी दिला.

महागाव पोलीस ठाण्याच्या वतीने आयोजित या बैठकीत तालुक्यातील शाळा वाहनचालकांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. वाहन चालविताना वेगमर्यादेचे पालन करणे, क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी वाहून न नेणे, वाहनाची नियमित तांत्रिक तपासणी करणे, वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर टाळणे आणि सर्व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे, अशा सूचना देण्यात आल्या.

याशिवाय वाहनाची नोंदणी, विमा (इन्शुरन्स), प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (PUC), परवाना व इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याचेही आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या जीविताशी संबंधित जबाबदारी लक्षात घेऊन प्रत्येक वाहनचालकाने दक्षतेने वाहन चालवावे, असे पोलीस निरीक्षक वानखडे यांनी स्पष्ट केले.

बैठकीला तालुक्यातील शासकीय व खासगी शाळांच्या वाहनचालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सुरक्षित व शिस्तबद्ध वाहतुकीसाठी पोलिसांच्या या उपक्रमाचे वाहनचालकांनी स्वागत केले.

## फ्लिपकार्ट लॉजिस्टिक गोडाऊनमध्ये चोरी; विधीसंघर्षग्रस्त बालक ताब्यात

प्रतिनिधी १८ जुलै

**यवतमाळ :** शहरातील फ्लिपकार्ट लॉजिस्टिक गोडाऊनातून मोबाईल व सॅमसंग कंपनीचे बड्स चोरी झाल्याप्रकरणी अवधूतवाडी पोलिसांनी तातडीने कारवाई करत एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीस गेलेला शंभर टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फ्लिपकार्ट लॉजिस्टिक गोडाऊनातून २१ हजार ४०० रुपये किमतीचा मोबाईल आणि १६ हजार ५०० रुपये किमतीचे सॅमसंग कंपनीचे बड्स असा एकूण ३७ हजार ९०० रुपयांचा ऐवज चोरीला गेला होता. याप्रकरणी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक माहिती आणि गोपनीय सूत्रांच्या आधारे एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले. चौकशीत त्याच्याकडून चोरीचा गुन्हा उघड झाला. त्यानंतर त्याच्या ताब्यातून चोरीस गेलेला मोबाईल व हेडफोन असा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अजित कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनकांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक जिंदमवार, हेड कॉन्स्टेबल विशाल भगत, पोलीस शिपाई मोहम्मद भगतवाले आणि कमलेश भोयर यांनी केली.

# प्रेमाच्या आमिषातून तरुणीचे शोषण

## लग्नाच्या दबावासाठी अश्लील व्हिडिओचा वापर, आरोपीवर पोक्सोसह ॲट्रॉसिटी

प्रतिनिधी १८ जुलै

**उमरखेड :** महाविद्यालयीन शिक्षणादरम्यान झालेल्या ओळखीचा गैरफायदा घेत एका तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उमरखेड येथे उघडकीस आला आहे.

अश्लील फोटो व व्हिडिओ चित्रित करून ते सोशल मीडियावर प्रसारित करण्याची धमकी देत लग्नासाठी दबाव टाकणे, जातिवाचक शिवीगाळ करणे आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी उमरखेड पोलिसांनी एका तरुणाविरुद्ध पोक्सो, अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यासह विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२४ मध्ये महाविद्यालयात शिक्षण घेत असताना पीडित तरुणीची रवी रितेश जाधव (रा. रूपाळा) याच्याशी ओळख झाली. प्रेमसंबंधाच्या नावाखाली आरोपीने तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर २२ जुलै २०२४ रोजी फिरायला जाण्याच्या बहाण्याने तिला एका लॉजवर नेऊन लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्याचवेळी दोघांचे अश्लील फोटो व व्हिडिओ मोबाईलमध्ये चित्रित करण्यात आल्याचेही नमूद आहे.

यानंतर संबंधित फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत आरोपीने वारंवार शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे. पीडितेने विवाहास नकार दिल्यानंतर आरोपीने तिचा पाठलाग सुरू ठेवला. ती आई व भावासह दुसऱ्या शहरात राहण्यासाठी गेल्यानंतरही तेथे जाऊन तिला त्रास दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

तसेच आरोपीने फोनवरून जातिवाचक शिवीगाळ करत लग्नासाठी दबाव टाकला. फोटो व्हायरल करण्याची, आत्महत्या करण्याची तसेच पीडितेसह तिच्या आईला जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप आहे. १३ जुलै रोजी आरोपीने दोघांचे फोटो व व्हिडिओ इन्स्टाग्रामवर प्रसारित केल्याचे समजल्यानंतर पीडितेने उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीवरून उमरखेड पोलिसांनी आरोपीविरुद्ध पोक्सो कायदा, अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा आणि अन्य संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

# शिवसेनेच्या बीएलए पदाधिकाऱ्यांची बैठक

## मतदार पडताळणी व संघटन विस्तारावर भर

प्रतिनिधी १८ जुलै



**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील निंगणूर येथे शिवसेनेच्या वतीने जिल्हा परिषद सर्कलअंतर्गत बीएलए (बूथ लेव्हल एजंट) पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीची पडताळणी, विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) मोहीम आणि पक्ष संघटना बळकट करण्याबाबत या बैठकीत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीत एसआयआर मोहिमेअंतर्गत बूथनिहाय जबाबदाऱ्या, मतदार नोंदणी व पडताळणी, तसेच नवीन सदस्य नोंदणी अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबत चर्चा झाली. प्रत्येक बीएलएने आपल्या बूथवर सक्रियपणे काम करत नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवावा आणि पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन मान्यवरांनी केले. "८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण" हा पक्षाचा मूलमंत्र अंगीकारून कार्य करण्याचेही मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीस शिवसेना नेते साहेबराव कांबळे, तालुकाप्रमुख प्रवीण पाटील मिरासे, जिल्हा नियोजन समिती सदस्य मोहन नाईक, तसेच बालाजी महाले, अंकुश राठोड, पी. सी. भोळे, मंगेश राठोड, देविदास खंदारे, बाबर लाला, मुतालिका खान, बाळू जाधव, शंकर जाधव, प्रमोद पंडागळे, प्रल्हाद महाराज आदी पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी उपस्थित पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# शेंबाळपिंपरीचा 'एसआयआर पॅटर्न' चर्चेत; एकाच शिबिरात १७७ कुटुंबांचे अर्ज भरून विक्रम

प्रतिनिधी १८ जुलै



**शेंबाळपिंपरी :** विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत शेंबाळपिंपरी येथे आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय शिबिरात तब्बल १७७ कुटुंबांचे अर्ज भरून घेण्यात आले. जिल्ह्यातील या उपक्रमाची विक्रमी नोंद मानली जात असून, गावातील नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिबिर यशस्वी ठरल्याची प्रतिक्रिया आयोजकांनी व्यक्त केली.

गावातील तरुण आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून जैनुलभाई सिद्दीकी यांच्या निवासस्थानी हे शिबिर पार पडले. सरपंच तथा प्रशासक रवींद्र महल्ले यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. मतदान यादीतील कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये, या उद्देशाने नागरिकांना एसआयआरचे अर्ज भरून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

शिबिरादरम्यान बीएलओ सतीश भगत, राहुल बंबल आणि व्ही. एम. ससाणे यांनी १७७ कुटुंबांचे अर्ज स्वीकारून प्रक्रिया पूर्ण केली. शिस्तबद्ध नियोजन आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे हा उपक्रम विशेष ठरला. २९ जुलैपर्यंत सुरू असलेल्या विशेष पुनरिक्षण मोहिमेदरम्यान शेंबाळपिंपरीचा हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबवावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि गावातील तरुणांनी विशेष परिश्रम घेतले. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जैनुलभाई सिद्दीकी यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. विविध सामाजिक संस्था, पत्रकार आणि ग्रामस्थांनीही शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सक्रिय सहकार्य केले.

# संबंधित बियाणे कंपन्यांवर तात्काळ गुन्हा नोंदवा- पालकमंत्री

## सोयाबीन बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी ; नियोजन भवनातील बैठकीत दिले निर्देश

प्रतिनिधी १ ८ जुलै



**अमरावती:** उगवणक्षमता नसलेली सोयाबीन बियाणे विक्री केल्यासंबंधी संबंधित कंपन्यांवर तात्काळ गुन्हा नोंदवा. कृषी अधिकाऱ्यांनी आपआपल्या तालुक्यात आजच पाचही बियाणे कंपन्यांवर गुन्हे दाखल करा. चौदाही तालुक्यात हे गुन्हे दाखल करण्यात यावे. पोलीस अधीक्षकांनी पुढाकार घेऊन तात्काळ या गुन्ह्यांची नोंद करावी, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात पालकमंत्री बावनकुळे यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते. खासदार बळवंत वानखडे, अमर काळे, डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, प्रवीण पोटे-पाटील, ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, सुलभा खोडके, रवी राणा, प्रतापदादा अडसड, राजेश वानखडे, प्रवीण तायडे, उमेश उर्फ चंदू यावलकर, गजानन लवटे, केवलराम काळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त राकेश ओला, मनपा आयुक्त मंगेश गोंदवले, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, पोलीस अधीक्षक निकेतन कदम, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ आदी यावेळी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, लोकाभिमुख पारदर्शी आणि गतिमान सरकार हे आपले उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांची बियाण्यांच्या बाबतीत फसवणूक करणाऱ्या बूस्टर कंपनी, इनोवेज कंपनी, रवी सीड्स, पार्श्व कंपनी, श्री श्री सीड्स तसेच ग्रीन गोल्ड या कंपन्यांवर तात्काळ गुन्हे नोंदवा. त्या गुन्ह्यांची प्रत उद्या जिल्हाधिकारी महोदयांकडे सादर करा. पोलीस अधीक्षकांनी यावर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत पोलीस विभागाला निर्देश द्यावे. तसेच या कंपन्यांना ब्लॅक लिस्ट करण्यात यावे. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना माफी मिळणार नाही, असेही ते यावेळी म्हणाले. कृषी अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींशी भेटू शेतकऱ्यांची परिस्थिती वेळीच अवगत करणे अपेक्षित आहे. लोकप्रतिनिधीशी समन्वय साधून विकास कामे करण्यात यावी. सर्व विभागांनी वृक्ष लागवडीचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे. सध्याची परिस्थिती तसेच पुढील वर्षीचा विचार करता दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माणहोऊशकते.

# गुन्हे शाखेने कौशल्यपुर्ण तपास करुन जबरीने सोनसाखळी हिसकावणाऱ्या 3 आरोपी ताब्यात

प्रतिनिधी १ ८ जुलै



## १०० टक्के मुद्देमाल हस्तगत

**अमरावती :** १० जुलै रोजी पोलीस स्टेशन नांदगांवपेठ येथे फिर्यादी उषा लक्ष्मण व-हाडे, वय ६० वर्षे, रा. गजानन नगर, अमरावती यांनी तक्रार दिली की, फिर्यादी यांच्या घरी किराणा दुकान असून दिनांक ९ जुलै रोजी किराणा दुकानात हजर असता दोन अज्ञात ईसमांनी येवून त्यांना चॉकलेट व चिप्स विकत मागीतले असता फिर्यादी यांनी दिले. तेव्हा दोन इसमापैकी एकाने फिर्यादी यांना चाकूचा धाक दाखवून फिर्यादीचे गळयातील सोनसाखळी जबरीने हिसकावून नेले.

अशा तक्रारीवरुन पोलीस स्टेशन नांदगांवपेठ येथे अपराध कमांक २४७/२६ कलम ३०९ (४), ३ (५) भा. न्या. स. प्रमाणे गुन्हा नोंद आहे. गुन्हा नोंद झाल्यापासून गुन्हे शाखा, युनिट क्रमांक १, अमरावती शहर हे सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत होते. यातील आरोपीतांनी धाडसपुर्ण गुन्हा केला होता. त्यामुळे गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचारी यांनी आपले गुप्त बातमीदार सक्रीय करुन घटनास्थळावरील फुटेज तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरु केला. दरम्यान रेकॉर्ड वरील आरोपी चेक करण्यात आले अशातच गुप्त बातमीदार यांचेकडून माहिती प्राप्त झाली की, यातील नमुद गुन्हेगार ईसम यांनीच मिळून सदरचा गुन्हा केला आहे. अशा खात्रीशीर माहीती वरुन संशयीत ईसमांना ताब्यात घेवून विचारपूस केली असता सदरचा गुन्हा हा त्यांनीच संगनमत करून केलेला आहे.

आरोपीतांनी अशी कबूली दिल्याने आरोपीतां जवळून गुन्हयातील १००% मुद्देमाल जप्त करण्यात आला तसेच पुढील तपासकामी पोलीस स्टेशन नांदगांवपेठ यांच्या ताब्यात देण्यात आले.

ताब्यात घेतलेल्या आरोपींचे नाव व पत्ता -सुमित उर्फ विक्की देवानंद ढोके, वय ३३ वर्षे, काम मजूरी, रा. केवल कॉलनी, अमरावती , सुशिल प्रविण मेश्राम, वय २२ वर्षे, काम- शिक्षण (१२ वि पास), रा. जिल्हा परिषद शाळेजवळ, आम्रपाली कॉलनी शेगांव, अमरावती , रोहीत लोमेश काळे, वय २२ वर्षे, रा. विश्वप्रभा कॉलनी, अमरावती आहे.

जप्त मुद्देमाला मध्ये सोन्याची लगड १४ ग्रॅम २० मि.ली. किं. अं. १,९६,०००/-रु., एक ओला कंपनीची विना नंबरची ईलेक्ट्रीक मोपेड किं. अं. ८०,०००/-रु., एक व्हीवो कंपनीचा मोबाईल किं. अं. १५,०००/-रु. असा एकूण २,९१,०००/-रु. चा मुद्देमाल जप्त केला.

# चाटवाबोड रस्त्याच्या पुनर्बांधणीसाठी मंजुरी; सिटी न्यूज सुपर फास्ट वृत्ताची दखल

प्रतिनिधी १ ८ जुलै



**धारणी:** बऱ्याच काळापासून दयनीय अवस्थेत असलेल्या चटवाबोड रस्त्यावर अखेर दिलासा मिळाला आहे. अनेक वर्षांपासून, या खड्डेमय रस्त्यामुळे स्थानिक रहिवासी, शेतकरी, विद्यार्थी आणि वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर व्हायची, जेव्हा मोठे खड्डे पाण्याने भरून अपघातांचा धोका वाढायचा. आता, सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या पुनर्बांधणीला हिरवा कंदील दाखवला असून, त्यामुळे परिसरातील रहिवाशांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला आहे.

सूत्रांनुसार, चटवाबोड रस्त्याच्या सुमारे पाच किलोमीटरच्या पुनर्बांधणीसाठी प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया लवकरच सुरू करून पूर्ण करण्याची तयारी सुरू आहे. आवश्यक विभागीय औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर बांधकामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.स्थानिक गावकरी अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या बांधकामाची मागणी करत होते. रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे

दुचाकीस्वारांना सर्वाधिक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. त्यांची वाहने खड्ड्यांमध्ये अडकल्याने अनेकदा अपघात होत असत. गावकऱ्यांच्या मते, हा रस्ता आजूबाजूच्या गावांना जोडणारा एक महत्त्वाचा रस्ता आहे, परंतु त्याची अवस्था इतकी खालावली होती की प्रवास करणे धोकादायक बनले होते. पावसाळ्यात समस्या वाढली. पावसाळ्यात रस्ता पूर्णपणे बंद व्हायचा.रस्ता चिखल आणि खड्डयांनी भरलेला होता. काही ठिकाणी डांबर पूर्णपणे उखडले होते.

# अमरावतीत भटक्या कुत्रे व रस्त्यावरील जनावरांविरोधात धडक मोहीम

प्रतिनिधी १८ जुलै

## पाळीव प्राण्यांची नोंदणी करण्याचे आवाहन



**अमरावती:** शहरातील वाढत्या भटक्या कुत्र्यांचा उपद्रव, रस्त्यांवरील मोकाट जनावरांमुळे होणारे अपघात आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अमरावती महानगरपालिकेने मोठी कारवाई सुरू केली आहे. महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या निर्देशानुसार संपूर्ण शहरात भटके कुत्रे व रस्त्यावरील जनावरे पकडण्यासाठी विशेष धडक मोहीम राबविण्यात येत असून, या मोहिमेला सर्व विभागांत वेग देण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या विशेष पथकांकडून विविध प्रभागांमध्ये सकाळपासून सायंकाळपर्यंत कारवाई केली जात आहे. आज, दिनांक १७ जुलै २०२६ रोजी या मोहिमेदरम्यान एकूण २१ भटके श्वान पकडण्यात आले. रस्त्यांवर मोकाट फिरणारे कुत्रे, जनावरे तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या प्राण्यांना पकडून नियमानुसार पुढील कार्यवाही केली जात आहे. शहरातील मुख्य रस्ते, चौक, बाजारपेठा, शाळा, रुग्णालय परिसर आणि वर्दळीच्या भागांमध्ये या मोहिमेला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

महानगरपालिकेने पाळीव कुत्रे असलेल्या नागरिकांसाठीही महत्त्वाची सूचना जारी केली आहे. ज्या नागरिकांनी आपल्या पाळीव कुत्र्यांची महानगरपालिकेकडे अधिकृत नोंदणी केलेली नाही, अशा कुत्र्यांना पाळीव म्हणून मान्यता दिली जाणार नाही. त्यामुळे अशा प्राण्यांवरही नियमानुसार कारवाई होऊ शकते. नागरिकांनी कोणतीही गैरसोय टाळण्यासाठी तात्काळ आपल्या पाळीव कुत्र्यांची नोंदणी करून आवश्यक कागदपत्रे पूर्ण करावीत, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी स्वतः विविध भागात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देत मोहिमेत कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. नियोजनबद्ध आणि कठोर कारवाई करण्याचे आदेश देत प्रत्येक प्रभागात नियमित तपासणी करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

महानगरपालिका प्रशासनाच्या मते, शहरात भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या, रस्त्यांवर फिरणाऱ्या जनावरांमुळे वाहतुकीस होणारा अडथळा तसेच नागरिकांच्या जीवितास निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. अनेक भागांत नागरिकांकडून भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवाबाबत तसेच मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या अपघातांबाबत सातत्याने तक्रारी प्राप्त होत होत्या. त्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे.

# अमरावती विद्यापीठाला ए.आय.यू. दिल्लीचे शैक्षणिक व प्रशासकीय विकास केंद्र मंजूर

प्रतिनिधी १ ८ जुलै



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठासाठी भारतीय विद्यापीठ संघातर्फे 'शैक्षणिक व प्रशासकीय विकास केंद्र' स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. विद्यापीठाने यासंदर्भात पाठविलेल्या प्रस्तावाला ए.आय.यू. ने मान्यता दिली असून, हे केंद्र विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

**केंद्राचे मुख्य उद्दिष्ट**

ए.आय.यू. चे हे शैक्षणिक व प्रशासकीय विकास केंद्र विद्यापीठातील प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचा-यांच्या 'क्षमता बांधणी'साठी एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून काम करेल. यामध्ये विशेषतः तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, ई-गव्हर्नन्स, कृत्रिम बुध्दिमत्ता, मशिन लर्निंग, सायबर सुरक्षा आणि डेटा ॲनालिटिक्स यांसारख्या आधुनिक विषयांवर प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- 2020), भारतीय ज्ञान प्रणाली आणि शाश्वत विकास उद्दिष्टांना गती देणे हे या केंद्राचे मुख्य ध्येय आहे.

**महत्त्वाच्या तरतुदी**

ए.आय.यू. च्या या केंद्राच्या स्थापनेसाठी आणि कामकाजासाठी भारतीय विद्यापीठ संघ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला एक लक्ष रुपयाचे बीज अनुदान देणार आहे. विद्यापीठाला वर्षातून किमान पाच 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम', यामध्ये किमान एक कार्यक्रम हा प्रत्यक्ष स्वरुपाचा राहणार असून त्यामुळे थेट संवाद व प्रत्यक्ष कृती करून शिकता येईल. आयोजित करण्यात येणा-या पाच कार्यक्रमांपैकी एक कार्यक्रम विद्यापीठीय प्रशासक आणि संस्थात्मक प्रमुखांसाठी घेण्यात येईल. सदर केंद्र विद्यापीठातील शैक्षणिक वातावरण सुधारण्यासाठी आणि प्रशासकीय कार्यक्षमता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास भारतीय विद्यापीठ संघने व्यक्त केला असून या केंद्राच्या माध्यमातून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संशोधन आणि नाविन्यपूर्ण अध्यापन पध्दतींना चालना मिळेल, असा विश्वास कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केला.

# प्राणघातक शस्त्र जवळ बाळगुण धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीला अटक

प्रतिनिधी १ ८ जुलै



**अमरावती :** राजापेठ पोलीसांनी प्राणघातक शस्त्र जवळ बाळगण धुमाकुळ करणा-या आरोपीला ताब्यात घेतले आहे.

सदर प्रकरणाची हकीकत अशा प्रकारे आहे की, पोलीस स्टेशन राजापेठचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना एक इसम देशपांडे प्लॉट, येथे हातामध्ये चायना चाकु घेवुन धुमाकुळ करीत असल्याची माहीती मिळताच त्यांनी राजापेठ डि.बी ला आदेश देवुन ताबडतोब सदर इसमाला पकडुन कार्यवाही बाबत आदेश दिल्याने राजापेठ डि. बी. चे प्रमुख सपोनी नितीन शिंदे व सोबत पो स्टॉफ हे दि. 17/07/2026 चे 17.30 वा. देशपांडे प्लॉट, अमरावती येथे रखाणा झाले. त्यांना तेथे एक इसम प्राणघातक शस्त्र घेवुन धुमाकुळ करतांना दिसुन आला. वरून पो. स्टॉफ व पंचां समक्ष आरोपी नामे मनोज हरीहरप्रसाद पाठक, वय 47 वर्षे, रा. देशपांडे प्लॉट, अमरावती याला ताब्यात घेण्यात आले.

नमुद आरोपी याचे कडुन एक चायना चाकु एक चायना चाकु ज्याची एकुण लांबी 11.3 ईच. पात्याची लांबी 6.4 इंच व मुठची लांबी 4.7 इच, पात्याची रूंदी 1.3 ईच असलेला कि अं 1500 रूचा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

नमुद आरोपी हे सर्वसामान्य लोकांच्या मनामध्ये दहशत पसरवीत होते. वरून त्यांचे विरूध्द पो. स्टे. ला अपराध कमांक 603/2026 कलम 4/25 आर्म ॲक्ट सहकलम 135 मपोका अन्वये दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि 2 अमरावती, संजय खटाळे, सहायक पोलीस आयुक्त, अमरावती, यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप चव्हाण, सपोनी नितीन शिंदे, पोहेकॉ मनीश करपे, पोहेकॉ पवन तिवारी, पोहेकॉ पंकज खटे, पोहेका रवी लीखीतकर, पोहेकॉ शशी शेळके, पोकॉ अंकुश काळे, पोकॉ मंगेश कपीले, पोकॉ नरेश बावने, पोकॉ प्रशांत बेलोरकर, पोका अर्जुन कदम, पोकॉ अमोल खंडेजोड, पोकॉ आकाश यादव, पोकॉ रफीक खान, पोकॉ यश ओगले, यांनी केली.

# निवृत्तीवेतनधारकांसाठी मोबाईल ॲपचे प्रशिक्षण व मार्गदर्शन मेळावा 21 जुलै रोजी

प्रतिनिधी १ ८ जुलै

**अमरावती:**राज्यातील सेवानिवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना त्यांच्या पेन्शनशी संबंधित विविध सेवा अधिक सुलभ, जलद आणि घरबसल्या उपलब्ध व्हाव्यात यासाठी संचालनालय, लेखा व कोषागारे यांच्या वतीने 'Maha-UPLABDHI' हे अद्ययावत मोबाईल ॲप्लिकेशन विकसित करण्यात आले आहे. या नवीन ॲपची सविस्तर माहिती पोहोचवण्यासाठी आणि पेन्शनधारकांना या तंत्रज्ञानाबाबत प्रशिक्षित करण्यासाठी अमरावती जिल्हा कोषागार कार्यालयांतर्गत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा माहिती व प्रशिक्षण मेळावा मंगळवार, दिनांक 21 जुलै 2026 रोजी सकाळी 11 वाजता जिल्हा कोषागार कार्यालयातील जिजाऊ सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

या ॲपच्या सुविधेमुळे आता पेन्शनधारकांना विविध कामांसाठी कोषागार कार्यालयात जाण्याची आवश्यकता भासणार नाही. तरी अमरावती कोषागार अंतर्गत येणाऱ्या सर्व सेवानिवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी या विशेष सत्राला विहित वेळेत उपस्थित राहून डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयाचे वरिष्ठ कोषागार अधिकारी विजय जवंजाळ यांनी केले आहे.

# मंत्री डॉ. अशोक उईके यांचा दौरा

**अमरावती:** आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके हे शुक्रवार, दि. 17 जुलै व शनिवार, दि. 18 जुलै रोजी अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

या दौऱ्यानुसार, डॉ. उईके यांचे आज दि. 17 जुलै, 2026 रोजी सायंकाळी 5 वाजता मोटारीने यवतमाळ येथून अमरावती-अचलपूर मार्गे चिखलदराकडे प्रस्थान करतील. रात्री 9 वाजता शासकीय विश्रामगृह चिखलदरा येथे आगमन व मुक्काम करतील.

शनिवार, दि. 18 जुलै, 2026 रोजी सकाळी 10.30 वाजता आरोग्य प्रशिक्षण केंद्र, चिखलदरा येथे विविध विषयाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीसाठी उपस्थित राहतील. व सोईनुसार चिखलदरा येथून मोटारीने यवतमाळकडे प्रस्थान करतील.

# दुचाकी चालकांसाठी हेल्मेट वापरणे बंधनकारक

प्रतिनिधी १ ८ जुलै

## अमरावती शहर पोलिसांचा निर्णय



**अमरावती :** दुचाकी चालकांसाठी हेल्मेट वापरणे आता बंधनकारक राहणार असून ग्रामीण पोलिसांनंतर आता अमरावती शहर पोलिसांचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भाचे आदेश पोलीस उपायुक्त श्याम घुगे यांनी काढले आहे.

वाहतुक नियमांचे पालन आणि नागरिकांच्या प्राणांचे रक्षण करणे ही पोलीस प्रशासनाची सर्वोच्च प्राथमीकता आहे.

सन 2024 वर्षामध्ये पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर हद्दीत एकुण 454 अपघात झाले आहेत. सन 2025 वर्षामध्ये एकुण 417 अपघात झाले आहेत. तसेच दिनांक 1 जानेवारी 2026 ते 30 जुन 2026 पर्यंत 210 अपघात झाले आहेत.

एकुण प्राणांकित अपघातांपैकी 60% च्या आसपास अपघात हे मोटरसायकल चालकांचे होतात. तसेच मोटर सायकल अपघातांमध्ये मृत्युमुखी पडणारे वाहन चालकांचा मृत्यु हा डोक्यात हेल्मेट घातले नसल्यामुळे डोक्यास गंभीर दुखापत होवुन मृत्युचे प्रमाण अधिक आहे.

मोटर वाहन कायदा, 1988 च्या कलम 129 (सुधारित कायदा 2019) नुसार सर्व दुचाकी चालक आणि त्यांच्या मागे बसणाऱ्या व्यक्तीला (Pillion Rider) यांनी आय.एस.आय. (ISI) मार्क असेलेले हेल्मेट वापरणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे. दुचाकी वाहन अपघातामध्ये वाढलेले मृत्युचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने सर्व दुचाकी चालक व मागे बसणार व्यक्तीस हेल्मेट सक्ती करणे गरजेचे आहे.

**महत्वाच्या सुचना व अंमलबजावणी**

**हेल्मेट अंमलबजावणी:-** पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर हद्दीत येणार सर्व राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, ग्रामीण शहरी व इतर रस्त्यांवर दुचाकी चालवतांना चालक व मागे बसणार व्यक्तीस प्रमाणीत हेल्मेट घालणे शुक्रवार दिनांक 24.07.2026 पासुन अनिवार्य करण्यात येणार आहे.

**कारवाईचा ईशारा :-** शुक्रवार दिनांक 24.07.2026 पासुन वाहतुक विभाग, अमरावती शहर तर्फे आयुक्तालय क्षेत्रात दुचाकी चालकांना व त्यांचे पाठीमागे बसणारे व्यक्तींना हेल्मेट घालणे बंधनकारक केले जाणार आहे. त्या करीता विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. दुचाकी चालक आणि त्याचे पाठीमागे बसलेले व्यक्ती विनाहेल्मेट वाहन चालवितांना/प्रवास करतांना आढळल्यास मोटर वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. वारंवार उल्लंघन करणार दुचाकी चालकांचे ड्रायव्हींग लायसन्स (परवाना) 03 महिन्याकरीता निलंबीत केला जाऊ शकतो.

**आम्हा सर्वांचे एकच आवाहन** :-सुरक्षीत प्रवास, सुरक्षीत परिवार !

**दुचाकी चालवतांना हेल्मेटचा वापर नक्की करा !**

हेल्मेट हा केवळ पोलीसांच्या दंडापासुन वाचण्याचा उपाय नसुन, तुमच्या स्वतःच्या आणि तुमच्या कुटुंबाच्या सुरक्षेचे कवच आहे. वाहतुक विभाग, अमरावती शहर तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, या मोहिमेला उत्स्फुर्त प्रतिसाद देवुन जबाबदार नागरिक म्हणुन दुचाकी चालवितांना हेल्मेटचा वापर करुन आपले कर्तव्य पार पाडुन आवश्यक सहकार्य करावे असे पोलिसांनी कळवले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार, दि.१८ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




मंगळवार, दि.१४ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

वस्तीगृहाच्या नावावर कोट्यवधीची लुबाडणूक...

शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून अतिक्रमण

* जमीन तब्यात घ्या, चौकशी करून गुन्हे दाखल करा; अन्यथा आंदोलन * सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांचा इशारा

तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांचे चौकशीचे पत्र

न्यायालयीन कामकाजाच्या नावाखाली दिशाभूल

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि.१७ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण !

* वस्तीगृहाच्या नावावर अनुदान लूटले, आता पुन्हा बांधकाम करीत सुटले

अधिकारी व पुढाऱ्याची मिली

# अतिक्रमण

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शासन श्रीमंतांनी तक्रार केली तर गरीबांचे अतिक्रमण क्षणात काढते, गरीबांचा संसार उघड्यावर आणते. नगर पालिकाही गरीबांचे अतिक्रमण काढून छोट्या व्यवसायीकांना व गरीबांना रस्त्यावर आणते. मात्र, श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण १३ वर्षापासून तक्रार करूनही काढत नसल्याने अधिकारी गरीब श्रीमंत असा भेदभाव करीत असल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांने तरी गरीबाबरोबर श्रीमंतांचेही पक्के अतिक्रमण पाडावे व कायद्याचे पालन करावे अशी मागणी सुभाष देव्हढे यांनी केली आहे.

# गरीबांचे काढतात, श्रीमंतांचे सोडतात !

## गरीब, श्रीमंत असा भेदभाव करतात


येथील आर. ए. कॉलेज यांनी शासनाच्या सिटनंबर २७/२३ या जागेवर यु.जी. एस.सि. योजनेअंतर्गत अनुदान घेवून अवैधरित्या मुलाच्या वस्तीगृहाचे बांधकाम केले. व १०२८१ चौ.मि. जागा अनाधिकृतपणे हडप केली. या सर्वांच्या चुकीच्या कामाची चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे व जागा व इमारत सरकारच्या ताब्यात घ्यावी. यासाठी वेळोवेळी आंदोलने, उपोषणे करूनही न्याय मिळाला नाही. तत्कालीन आ.स्व. विनायक मेटे यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना पुन्हा स्मरण पत्र देवून चौकशी करण्याची मागणी पुन्हा स्मरण पत्राचे निवेदन देवून सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांनी केली आहे. अन्यथा पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला. तर या प्रकरणी जनहित याचीका दाखल करून न्यायालयातही न्याय मागणार असल्याचे देव्हडे यांनी सांगितले.

निवेदनानुसार स्थानिक राजस्थान आर्य शिक्षण संस्था वाशीम यांचे अध्यक्ष / सचिव तथा संचालक मंडळाने शासनाची दिशाभुल करून खोटे दस्ताऐवज तयार केले. खोट्या दस्ताऐवजाच्या आधारे मुलाच्या वस्तीगृहाचे बांधकाम करण्यासाठी यु.जी.एस.सी. मार्फत सन २०१० मध्ये १.५० कोटी रूपये अनुदान लाटले. व बांधकाम केले. सदर बांधकाम ज्या जागेवर केलेत ती जागा सिट क्रमांक २७/२३ १०२८१ चौ.मि. ही शासनाची असून त्यावर सुध्दा अतिक्रमण केलेले आहेत. असे असतांना ज्या उद्देशासाठी शासनाचे अनुदान घेतले आहे व जागा हडप केलेली आहे हे मुलीचे वस्तीगृह बांधकाम केले तेव्हापासून आजपर्यंत मुलीच्या वास्तव्यासाठी वापरात नसुन त्याचा गैरवापर आर्य शिक्षण संस्था करीत आहे. यापुर्वीही तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी २०१३ मध्ये तहसीलदारांना अतिक्रमणाबाबत सुचना देवून योग्यती कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मात्र संबंधित संस्थान चालकांनी आर्थिक देवाण घेवाण करून ही कारवाई थांबविली होती. त्यानंतर वारंवार निवेदन देवून आंदोलन केले. मात्र अद्यापही कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे पुन्हा १४ जुलै २०२६ रोजी स्मरण पत्राचे निवेदन देवून कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. या निवेदनाची प्रतिलिपी महसुल मंत्री चंद्रकांत बानकुळे यांना पाठविली आहे. त्यामुळे आजपर्यंत संस्थेवर कोणतीच कारवाई न झाल्याने संबंधितांची चौकशी करून कारवाई करा अन्यथा पुन्हा धरणे आंदोलन करणार असल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांनी दिला आहे.



### १३ वर्षाचा लढा, अतिक्रमण काढा

शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून वसतीगृहाच्या नावावर कोट्यवधीचे अनुदान घेवून शासनाची व जनतेची फसवणूक करणाऱ्या आर्य शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाची व अधिकाऱ्यांची मिलीभगत असून यामध्ये कोट्यवधीची फसवणूक झाली आहे. यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे यांनी १३ वर्षापासून लढा देत आहेत. विविध आंदोलन व उपोषण, निवेदनातून अतिक्रमण काढण्याची मागणी करीत आहेत.


प्रति,
प्रभारी अधिकारी,
महसूल विभाग,जिल्हाधिकारी कार्यालय,वाशिम

विषय- आर.ए.कॉलेज वाशिम यांनी शासनाचे शिट नं.२७/२३ या जागेवर शासनाचे यु.जी.एस.सी.योजने अंतर्गत अनुदान घेवून मुलिचे वसतीगृह अवैधरित्या बांधकाम केले व जागा १०२८१ चौ.मी.अनाधीकृतपणे हडप केली आहे. त्यांचेकडून सदर जागा व इमारत सरकारच्या ताब्यात घ्यावी. त्यांनी केलेल्या चुकीच्या कामामुळे त्यांचेवर फौजदारी स्वरुपाचे खटले दाखल करावे अन्यथा न्याय मागणीसाठी आमरण उपोषणा बाबत.

संदर्भ- श्री.सुभाष उत्तमराव देव्हडे पाटील (सामाजिक कार्यकर्ता) रा.दुबळवेल ता.मालेगांव ह.मु.छत्रपती शिवाजी नगर, कोंडाळा रोड,वाशिम ता.जि.वाशिम यांची आमरण उपोषणाची नोटीस दिनांक ०५-१२-२०१७ प्राप्त दिनांक ०५-१२-२०१७

---००---

उपरोक्त संदर्भांकीत विषयाचे अनुषंगाने श्री.सुभाष उत्तमराव देव्हडे पाटील (सामाजिक कार्यकर्ता)रा.दुबळवेल ता.मालेगांव ह.मु.छत्रपती शिवाजी नगर, कोंडाळा रोड, वाशिम ता.जि.वाशिम यांची विषयांकित आमरण उपोषणाची नोटीस दिनांक ०५-१२-२०१७ रोजी या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

यासोबत प्राप्त झालेल्या नोटीसची मूळ प्रत संलग्न करुन पुढील कार्यवाहीस्तव आपणाकडे पाठविण्यात येत आहेत. त्यांचे नोटीस मधील वस्तुस्थिती तपासून नियमानुसार योग्यती कार्यवाही करावी तसेच केलेल्या कार्यवाही बाबत संबधितांना परस्पर अवगत करुन त्यांना या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्या पासून परावृत्त करावे.

सहपत्र- वरिल प्रमाणे
प्रतिलीपी,

जिल्हाधिकारी वाशिम,करीता

हेच ते पत्र

# थोडक्यात

## वाळकी, दोडकी व गिव्हा शाळांमध्ये जनजागृती अभियान

### विद्यार्थ्यांचा तंबाखूमुक्तीचा संकल्प



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विद्यार्थ्यांमध्ये तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता निर्माण करून शाळा परिसर तंबाखूमुक्त ठेवण्याच्या उद्देशाने जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय वाशिम यांच्या वतीने वाळकी, दोडकी आणि गिव्हा येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये 'तंबाखूमुक्त शाळा' मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी तसेच बाह्य संपर्क वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमात जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाचे जिल्हा सल्लागार डॉ. आदित्य पांढरकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत तंबाखूचे आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम चित्रफिती, माहितीपूर्ण चित्रे आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून समजावून सांगितले. तंबाखूमधील घातक रसायने, मुखाच्या कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय तसेच निरोगी जीवनशैलीचे महत्त्व याबाबत त्यांनी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण धाडवे यांनी 'तंबाखू मुक्त शाळा' या संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट करत 'कोटपा २००३' (ण्ध्ऊईं २००३) अंतर्गत तंबाखू विक्री व वापराबाबतच्या प्रमुख तरतुदी विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्या. व्यसनमुक्तीसाठी शासनाच्या १८००११२३५६ या मोफत टोल-फ्री क्रमांकाची माहिती देत गरजूंनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना तंबाखूविरोधी जनजागृतीपर माहितीपत्रकांचे वितरण करण्यात आले. तसेच शाळा परिसर तंबाखूमुक्त ठेवण्याचा सामूहिक संकल्प विद्यार्थ्यांनी केला. या उपक्रमाला संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




## तोतयागिरी, दादागिरी, फसवेगिरी...

# सिद्ध झाली गुन्हेगारी, दाखल झाली फौजदारी !

### कर्मचारी असल्याचे खोटे सांगने आले गळ्यात, अपंगत्व प्रमाणपत्रासाठी ४ हजारांची लाच घेणारा एसीबीच्या जाळ्यात

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हा सामान्य रुग्णालयातील अस्थिरोग विभागात गरिबांची आणि गरजूंची होणारी पिळवणूक अखेर चव्हाट्यावर आली आहे. स्वतः जिल्हा रुग्णालयाचा कर्मचारी असल्याचे खोटे सांगून रुग्णांची फसवणूक करणाऱ्या आणि अपंगत्वाचे नवीन प्रमाणपत्र देण्यासाठी एका दिव्यांग व्यक्तीकडे लाचेची मागणी करणाऱ्या एका खासगी इसमाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ४ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. सतीश बबन कवर (वय ३३ वर्ष, रा. तामसी, ता. जि. वाशीम) असे या लाचखोर खासगी इसमाचे नाव आहे.




याबाबत सविस्तर वृत्त असे की, एका ५६ वर्षीय दिव्यांग तक्रारदाराच्या ४१ टक्के अपंगत्व प्रमाणपत्राची मुदत संपली होती. त्यामुळे त्यांनी नवीन प्रमाणपत्र मिळवण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नावे ऑनलाइन अर्ज करून पावती भरली होती. मात्र, हे प्रमाणपत्र देण्यासाठी अस्थिरोग कक्षात खासगी इसम सतीश कवर याने स्वतः रुग्णालयाचा कर्मचारी असल्याचे खोटे भासवत तक्रारदाराचा विश्वास संपादन केला. आणि त्यानंतर १० हजार रुपयांची लाच मागितली. हक्काचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी लाच द्यावी लागत असल्यामुळे व्यथित झालेल्या तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) धाव घेऊन रीतसर तक्रार नोंदवली. लाचेची तक्रार प्राप्त होताच एसीबीच्या पथकाने पंचांसमक्ष या प्रकरणाची पडताळणी केली. तडजोडी अंती खासगी इसम सतीश कवर हा ४ हजार रुपये स्वीकारण्यास तयार झाला. लाचेची मागणी सिद्ध झाल्यानंतर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रुग्णालय परिसरात सापळा रचला. तक्रारदाराकडून लाचेची ४ हजार रुपयांची रक्कम स्वीकारताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने या खासगी इसमाला रंगेहात पकडले .कारवाईदरम्यान आरोपीच्या अंगझडतीतून लाचेच्या रकमेसह एकूण ४ हजार २४५ रुपये आणि एक ओप्पो कंपनीचा अँड्रॉइड मोबाईल फोन जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशीमचे पोलीस उपअधीक्षक जगदीश परदेशी यांच्या मार्गदर्शनात सापळा पथकातील पोलीस हवालदार विनोद मारकंडे, पोलीस हवालदार नितीन टवलारकर आणि पोलीस हवालदार योगेश खोटे (सर्व लाप्रवि वाशीम) यांनी अत्यंत गोपनीयतेने यशस्वीरीत्या पार पाडली.

# पावसाचा खंड कालावधीत पिकांची शास्त्रीय पद्धतीने काळजी घ्यावी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

यंदाच्या खरीप हंगामात काही भागांमध्ये पावसाचा खंड पडल्याने जमिनीतील ओलावा कमी होत असून खरीप पिकांवर पाण्याचा ताण येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी घाबरून न जाता शास्त्रीय पद्धतीने पिकांचे व्यवस्थापन करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह यांनी केले आहे.

जमिनीत पुरेसा ओलावा नसताना उगवणीनंतर वापरावयाची तणनाशके तसेच विविध संप्रेरके, बुरशीनाशके आणि कीटकनाशकांची अनावश्यक फवारणी टाळावी. पाण्याच्या ताणाच्या अवस्थेत रासायनिक फवारणीमुळे पिकांवर अतिरिक्त ताण निर्माण होण्याची शक्यता असते.



जमिनीत किंचित ओलावा असल्यास हलका डवऱ्याचा फेर देऊन अंतरमशागत करावी. मात्र खोल मशागत टाळावी. मशागत करताना पिकांच्या मुळांना इजा होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी.

सलग सात ते आठ दिवस पावसाचा खंड राहून पिके सुकण्याची लक्षणे दिसू लागल्यास कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्याने १३:०:४५ (पोटॅशियम नायट्रेट) हे खत १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे. ज्या शेतकऱ्यांकडे संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे त्यांनी ठिबक किंवा तुषार सिंचनाद्वारे हलके पाणी देऊन पिकांवरील ताण कमी करावा.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी बाबाराव पाटील खडसे यांची निवड

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जेष्ठ नेते आणि शरद पवारांचे अत्यंत विश्वासू म्हणून ओळखले जाणारे बाबाराव पाटील खडसे यांची पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या स्थापनेपासून म्हणजेच १९९९ पासून आजतागायत खडसे पाटील हे शरदचंद्र पवार यांचे एकनिष्ठ म्हणून काम करत आहेत. त्यांची ही दीर्घकालीन निष्ठा आणि पक्षासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांच्याकडे ही मोठी जबाबदारी सोपविण्यात आली असल्याची माहिती पक्षाच्या सूत्रांनी दिली आहे. बाबाराव पाटील खडसे यांच्यासारख्या अभ्यासू, मृदू आणि जनतेशी नाळ जोडलेल्या नेत्याला प्रदेश पातळीवर संधी मिळाल्याने वाशिम जिल्ह्याचा मान वाढला असल्याचे सामान्य नागरिक बोलत असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाभर आनंदोत्सव साजरा केला आहे.



बाबाराव पाटील हे उच्चविद्याविभूषित असून उत्तम वक्ते म्हणून सुपरिचित आहेत. जीवन विकास शिक्षण संस्थेचे संस्थापक म्हणून त्यांनी ग्रामीण भागातील हजारो गोरगरीब विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. तद्वतच बालाजी सहकारी सूतगिरणीची स्थापना करून त्यांनी सहकार क्षेत्रातही मोठे योगदान दिले आहे. बाबाराव पाटील खडसे हे गेली अनेक वर्षे शेतकरी, कष्टकरी आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी पक्षाच्या माध्यमातून आक्रमकपणे लढत आहेत. त्यांच्यावर टाकण्यात आलेल्या या नव्या जबाबदारीमुळे जिल्ह्याला राज्याच्या राजकारणात अधिक वजन मिळेल असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.

# वैदिक गणितामुळे कठीण प्रमेय क्षणार्धात सोडविता येतात !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

## वैदिक गणिततज्ञ शेफाली जोशी



विद्या भारती वाशिम जिल्ह्यातर्फे दिनांक १५जुलै आणि १६ जुलै २०२६ रोजी वाशिम येथे रेखाताई राष्ट्रीय कन्या शाळेच्या सभागृहात दोन दिवसाची वैदिक गणित कार्यशाळा वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती.कार्यशाळेचा समारोप गुरूवार दिनांक १६/७/२०२६ रोजी संपन्न झाला.

समारोपीय कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या वैदिक गणित तज्ञ सौ.शेफालीताई जोशी,नागपूर ह्या होत्या.समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून रा.स्व.संघाचे जिल्हासंघचालक अभियंता श्री.शंकरराव ढोबळे हे होते.तर विशेष अतिथी म्हणून माजी आमदार विधीज्ञ श्री.विजयराव जाधव होते. विशेष उपस्थितीत नगर परिषद वाशिमचे बांधकाम सभापती श्री.राहुल तुपसांडे आणि न.प.च्या स्थायी समिती सदस्या सौ.जयश्रीताई वानखेडे ह्या होत्या.मंचावर विद्याभारती विदर्भ प्रांत उपाध्यक्ष विधीज्ञ श्री.सत्यानंद कांबळे,विद्या भारती प्रांत सहमंत्री विद्यावाचस्पती प्रा.दिलीप जोशी,संस्थेच्या सचिव कु.लुंबिनी कांबळे यांची उपस्थिती होती.वैदिक गणित हा गणितिय दृष्टीकोन देणारा प्राचीन विषय असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान परंपरेचा दिव्य भाग आहे.वैदिक गणितामुळे अवघड प्रमेय चुटकीसरशी सोडवता येतात.वैदिक गणित आता जगमान्य झाले असून त्याचा उपयोग जीवनाच्या सर्व क्षेत्रात केल्या जात असल्याचे प्रतिपादन विद्या भारतीच्या विदर्भ प्रांत वैदिक गणित संयोजिका तथा वैदिक गणित तज्ञ सौ.शेफालीताई जोशी नागपूर यांनी केले.त्यांनी या प्रसंगी चार अंकी संख्या गुणिला चार अंकी संख्येचा गुणाकार पंधरा सेकंदाच्या आत विद्यार्थी कसे करतात याचे प्रात्यक्षिक दाखविले.यावेळी उपस्थितांनी अवाक होऊन तोंडात बोटे घातली.

यावेळी उपस्थितांनी उत्सुकता म्हणून अवघड गुणाकार विद्यार्थ्यांना सांगितल्यावर विद्यार्थ्यांनी काही सेकंदात सोडविल्यावर सर्वांनी आश्चर्य व्यक्त केले.पायथागोरसचे प्रमेय कितीतरी आधी वैदिक गणितात असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी ते देखिल तीस सेकंदाच्या आत सोडवून दाखविले.अनेक कठीण प्रमेय विद्यार्थ्यांनी सहज सोडवून दाखविले.

यावेळी माजी आमदार विजयराव जाधव,सभापती राहुल तूपसांडे आणि सौ.जयश्रीताई वानखेडे यांनी मनोगतातून वैदिक गणितामुळे विद्यार्थ्यात झालेल्या बदलाबद्दल कौतुक केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष प्रा. अनिल धुमकेकर यांनी तर सूत्रसंचालन जिल्हा मंत्री प्रा.श्रीकांत जोशी यांनी केले. कार्यक्रमाला वाशिममधील निवडक १० शाळांमधून निवडक २६५ विद्यार्थ्यांनी निःशुल्क सहभाग नोंदवला.

## ऊन-सावलीचा खेळ, अन् सोसाट्याचा वारा...

# पेरणी झालेले शेतकरी हवालदिल; दुबार पेरणीचे संकट !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

यावर्षी समाधान कारक पाऊस होईल असे सांगितले जात होते. प्रारंभीच्या काळात चांगला पाऊस झाला देखील, परंतु आता घोटा चिखली, परिसरातील पचास टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाल्यानंतर पावसाने दडी मारली आहे. कमी अधिक प्रमाणात तालुक्यात सर्वत्र हीच परिस्थिती असून येत्या आठ दिवसात दमदार पाऊस न झाल्यास शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहू शकते. शेतकऱ्यांची उसनवारी, व्याजाने पैसे काढून खरीपाच्या पिकाची लागवड व पेरणी पूर्ण केली.

गत चार वर्षे पाऊस निराशाजनक दुष्ट चक्रांनी बळीराजाला आढळलेला पाहिला आहे. यावर्षी तरी निसर्ग आपली अनुकूलता दाखवणार नाही असे वाटत होते. मात्र याहीवर्षी अवकृपा



दाखवण्यास सुरुवात केली असून महागामोलाचे बियाणे मातीनंत जात आहे. पावसाने दडी मारल्याने नयके सुकू लागली आहेत. सध्या नुसत ऊन सावलीचा खेळ अन् सोसाट्याचा वारा सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांची काळजी फाटत आहे. गत आठ दिवसांपासून पाऊस पडला नसल्यामुळे कोमेजलेले पिके सुकू लागली आहे. यामुळे टाकरवण सह परिसरातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे असमानी संकट उभे राहते की काय, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

**रसशोषक किडींचा प्रादुर्भाव वाढल्याने चिंता...**

यावर्षी खरीप हंगामामध्ये उशिरा पावसाने संततधार हजेरी लावल्यानंतर त्यावेळेस बळीराजांनी आपल्या खरीपाच्या पेरण्या केल्या.परंतु सध्या गेल्या आठ दिवसांपासून पावसाने दडी मारली त्याचच आता खरीप हंगामातील उगवलेल्या पिकांवर सध्या रस शोषक किडींचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसून येत असल्यामुळे शेतकरी वर्गामध्ये पुन्हा एकदा चिंतेचे वातावरण निर्माण होत आहे.

**वीज नाही, पाणी नाही, नदी नाले कोरडे...**

संपूर्ण जून महिना ओला परंतु हा महिन्यात एकही जोरदार पाऊस न झाल्यामुळे घोटा ,चिखली सह परिसरातील नदी नाले अजूनही कोरडे ठाक आहे. त्यातच गत आठ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पिके कोमेजली जात आहे. त्यातच वीज पुरवठ्यामध्ये सातत्याने बिघाड होत असल्यामुळे शेतकऱ्यांपुढे पुन्हा एकदा नवीन संकट उभा राहत आहे.

# पिक विम्यात वन्य प्राण्याकडून फस्त केलेल्या पिकांचा समावेश करावा

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यातील पेरणी केलेल्या पिके जमिनीच्या वर आली असून पहिल्या टप्प्यात कोळपणे शेतकरी वर्ग करीत आहेत. मात्र वन्य प्राणी रोही व हरीण हे या पिकांना फस्त करत असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचा याचा फटका बसत आहे. म्हणून शासनाने पिक विम्यामध्ये वन्य प्राण्याकडून फस्त केलेल्या पिकांचा समावेश करावा अशी मागणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांमधून होत आहे.

रिसोड तालुक्यात गेल्या जूनच्या व शेवटच्या व जुलैच्या पहिल्या आठवड्यात पावसाचे झडपाने अनेक शेतकऱ्यांनी विविध पिकांची पेरणी केली आहे. सध्या शेतकऱ्यांनी पेरणी



केलेले कोळपणेही आलेले आहेत. शेतकरी व राजा एकमेकांचे कोळण्याच्या कामात मग्न असताना वन्य प्राणी हरीण, रानडुक्कर, रोही आदी हे पिके फस्त करून नासाडी करत आहेत. त्यामुळे कोळण्याचे पिकावर या वन्य प्राण्यांचा हल्ला होत असल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होत आहे. तसेच शासनाने सोयाबीन, तूर, मूग, उडीद आदी पिकांचा विमा संरक्षण नैसर्गिक आपत्तीचाही दिलेला आहे. अनेक शेतकरी हे पिक विमा काढण्यासाठी विविध केंद्रावर गर्दी करीत आहेत. मात्र पेरणी केलेल्या पिके हे वन्य प्राण्यांनी ह्या पिकांची वन्य प्राण्यांकडून नासाडी केली जात आहे. सध्या पहिल्या टप्प्यात पिकांची

अवस्था असल्याने आतापर्यंत रात्रींना पिके येण्यासाठी शेतकऱ्यांना रात्र-दिवस रक्षण करावे लागणार आहे. मात्र वन्य प्राणी हे दिवसा व रात्री फेरणाऱ्या कोळण्याच्या पिकावर हल्ला मारून हे पिके फस्त केल्या जात आहेत. त्यामुळे महागाईची बियाणे व खते टाकून पिके जाण्याची काम करत असताना वन्य प्राणी हे पिकांची नासाडी केल्यामुळे असल्याने शासनाने वन्य प्राण्यांनी फस्त केलेल्या पिकाची पिक विम्यात समावेश करावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# रेशन कार्डच्या ऑनलाइन अर्जांना मंजुरीचा खोळंबा; लाभार्थ्यांना प्रतीक्षा

## नवीन सदस्यांची नावे समाविष्ट होण्यास विलंबः कागदपत्रांसह अर्ज सादर करूनही महिनोमहिने प्रलंबित

प्रतिनिधी १८ जुलै

**खामगाव:** रेशन कार्डमध्ये नवीन सदस्याचे नाव समाविष्ट करण्यासाठी शासनाने ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली असली, तरी अर्ज मंजुरीच्या प्रक्रियेला विलंब होत असल्याने अनेक लाभार्थींना अडचणींचा सामना करावा लागत आहे. आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करूनही अनेक अर्ज अद्याप मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याने रेशनसह विविध शासकीय योजनांचा लाभमिळण्यात अडथळे येत आहेत.



नवीन सून, नवजात बालक किंवा इतर सदस्याचे नाव रेशन कार्डमध्ये समाविष्ट करणे आवश्यक असते. कुटुंबातील सदस्यसंख्येनुसार वितरण व्यवस्थेतील धान्य तसेच विविध योजनांचा लाभ दिला जातो. नागरिकांची शासकीय कार्यालयातील धावपळ कमी करण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाने ही प्रक्रिया ऑनलाइन केली; मात्र अनेक अर्ज प्रलंबित अवस्थेतच राहिल्याने लाभार्थ्यांना अनेक महिने प्रतीक्षा करावी लागत आहे. पुरवठा विभागाच्या माहितीनुसार, अर्जांची संख्या वाढल्याने मंजुरी प्रक्रियेला ही विलंब झाला.

### नाव समाविष्ट न झाल्याने आर्थिक फटका !

रेशन कार्डमध्ये नवीन सून, नवजात बालक किंवा इतर सदस्याचे नाव वेळेत समाविष्ट न झाल्यास संबंधित सदस्याच्या वाट्याचे धान्य मिळत नाही. परिणामी काही कुटुंबांना अतिरिक्त धान्य बाजारभावाने खरेदी करावे लागते. तसेच विविध शासकीय योजनांच्या लाभातही विलंब होतो.

### अर्ज 'पेंडिंग', नागरिकांमध्ये संभ्रम !

रेशन कार्डमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी ऑनलाइन सुविधा सुरू असली, तरी अनेक अर्ज अद्याप मंजूर झालेले नाहीत. अर्ज सादर करून अनेक महिने उलटूनही त्यांची स्थिती प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

### ही कागदपत्रे आवश्यक!

नवीन सदस्याचे नाव रेशन कार्डमध्ये समाविष्ट करण्यासाठी संबंधित सदस्याचा आधार क्रमांक, जन्म दाखला (नवजात बालका साठी), विवाहानंतरच्या सुने साठी विवाह नोंदणी अथवा इतर आवश्यक पुरावे, तसेच विद्यमान रेशन कार्डाची प्रत आवश्यक असते.

### ऑनलाइन प्रक्रिया अधिक गतिमान करण्याची अपेक्षा

ऑनलाइन व्यवस्थेचा उद्देश नागरिकांची धावपळ कमी करणे हा असला, तरी मंजुरीला विलंब होत असल्याने लाभार्थ्यांना वारंवार पाठपुरावा करावा लागत आहे. त्यामुळे प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करण्याची मागणी होत आहे.

# चिखली नगर परिषदेच्या धर्तीवर खामगाव नगर परिषदेनेही वाढीव करवाढ रद्द करावी

## राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांची मागणी

प्रतिनिधी १८ जुलै



**खामगाव:** जिल्ह्यातील चिखली नगर परिषद प्रशासनाने नागरिकांसाठी दिलासादायक निर्णय घेतला असून वाढीव करवाढ रद्द केली आहे. त्याच धर्तीवर खामगाव नगर परिषदेनेही सकारात्मक निर्णय घेऊन वाढीव करवाढ रद्द करावी अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी केली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत व औद्योगिक नगर अधिनियम १९६५ नुसार नगर परिषदांनी साधारणता प्रत्येक चार वर्षांनी करांचे पुनर्मूल्यांकन करून आवश्यकतेनुसार करवाढ करणे अपेक्षित असते. खामगाव नगर परिषदेत यापूर्वी करवाढ करण्यात आली होती. त्यानंतर २०१६ पासून खामगाव नगर परिषदेवर भारतीय जनता पक्षाचे नगराध्यक्ष कार्यरत होते. मात्र या कालावधीत नागरिकांवर कोणतीही करवाढ लावण्यात आली नाही.पुढे नगर परिषदेचा कारभार प्रशासकांच्या ताब्यात गेल्यानंतर प्रशासकीय स्तरावर करवाढीचा प्रस्ताव तयार करण्यात आला आणि त्यानुसार वाढ लागू करण्यात आली आहे. मात्र या वाढीव करामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. चिखलीच्या आमदार श्वेताताई महाले यांनी अधिवेशन संपताच या विषयाची तातडीने दखल घेतली. त्यांनी चिखली नगर परिषद प्रशासनाची बैठक बोलावून त्या बैठकीत करवाढ तात्काळ मागे घेण्याचे स्पष्ट व कडक निर्देश दिले आहेत. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील चिखली नगर परिषदेने नागरिकांच्या भावनांचा आदर करून घेतलेल्या या निर्णयाचे चिखली शहरात सर्व स्तरातून स्वागत होत आहे. दरम्यान खामगाव शहर ही व्यापारी बाजारपेठ असून शहराचे लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. नगरपरिषदेने प्रथम शहरातील मूलभूत व दर्जेदार नागरिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात नगर परिषदेचे उत्पन्न वाढवणे आवश्यक असले तरी त्यासाठी जनतेचा विश्वास संपादन करावा लागतो. नागरिकासाठी विकासात्मक कामे करावी लागत असले तरीही नागरिकांना झेपणार असाच कर नगर परिषदेने आकारला पाहिजे. गेल्या काही दिवसापासून नगरपरिषदेने वाढीव कर वाढ केल्यामुळे नागरिकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागतो. या वाढीव करवाढी विरोधात नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरले होते. त्यामुळे सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी खामगाव नगर परिषदेने ही चिखली नगर परिषदेच्या धर्तीवर वाढ रद्द करावी अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेशभाऊ चौकसे यांनी केली आहे.

# विद्युत वाहिनीची चार किलोमीटर तार लंपास; गुन्हा दाखल

प्रतिनिधी १८ जुलै

**खामगाव:** जयपूर लांडे शिवारातील महावितरणच्या लघुदाब विद्युत वाहिनीची तब्बल चार किलोमीटर लांबीची विद्युत तार अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीमुळे महावितरणचे सुमारे ४७ हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून, ग्रामीण भागातील वीज यंत्रणेच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. याप्रकरणी १७ जुलै रोजी खामगाव शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

महावितरणचे सहायक अभियंता सचिन मधुकर बावनकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, जयपूर लांडे शिवारातील रोहित्रावरील लघुदाब विद्युत वाहिनीची सुमारे चार किलोमीटर लांबीची, एकूण ५२८ किलो वजनाची विद्युत तार अज्ञात चोरट्यांनी चोरी करून नेली. या तारेची अंदाजे किंमत ४७ हजार रुपये असून, त्यामुळे महावितरणचे आर्थिक नुकसान झाल्याचे तक्रारीत म्हटले.या प्रकरणी खामगाव शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय विद्युत कायदा, २००३ च्या कलम १३६ अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास मनोहर गोरे करीत आहेत.

# जनता कला वाणिज्य महाविद्यालयात एकदिवसीय वनमहोत्सव उत्साहात साजरा

प्रतिनिधी १८ जुलै

**मलकापुर:-** जनता कला वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर येथे दि. ६ जुलै २०२६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत वनमहोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या वनमहोत्सवानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. चव्हाण यांच्या हस्ते तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सहभागातून महाविद्यालय परिसरात वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनाचे महत्व जाणून घेतले .




या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. आर. डी. इंगोले, डॉ. एल जी . कोलते डॉ. एस. एस. शुक्ला, डॉ. डी. आर. धुमाळे, डॉ. टी. पी. मोरे, प्रा. वाय. एस. राजपूत, डॉ. माळी, प्रा. डहाके ,प्रा. बर्डे, प्रा. अहिरे ,प्रा. सौ सुरवाडे मॅडम , प्रा.सौ खाचणे मॅडम, प्रा. प्रीती नाये मॅडम, प्रा. चौधरी मॅडम तसेच राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रफुल्लचंद्र भोगे यांनी परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण झाली असून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यास मदत झाली.

# चिखलीत बोगस सोयाबीन बियाणे प्रकरणी कृषि विभागाची कारवाई

प्रतिनिधी १८ जुलै

**चिखली:** चालू खरीप हंगामात चिखली तालुक्यात निकृष्ट व संशयास्पद सोयाबीन बियाण्यांमुळे अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. या प्रकरणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व युवासेनेने तालुका कृषी अधिकारी कार्यालयावर आंदोलन करून कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर कृषी विभागाने संबंधित कंपन्या व विक्रेत्यांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे.

तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या गुण नियंत्रण कक्षाच्या माहितीनुसार, १५ जुलैपर्यंत तालुक्यात एकूण ४८ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये महाबीज कंपनीविरोधात २१. अंकुर सीड्सविरोधात १७, पार्श्व जेनेटिक्सविरोधात ९, बुस्टर प्लांट जेनेटिक्स, ईगल सीडस व रवी सीड्सविरोधात प्रत्येकी २, तर बन्सल अॅग्रो, दफ्तरी आणि यशोदा सीड्सविरोधात प्रत्येकी १ तक्रार नोंदविण्यात आली आहे. या तक्रारींच्या अनुषंगाने बियाण्यांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. आतापर्यंत म्हणजेच १७ जुलै २०२६ पर्यंत तालुक्यातील जवळपास ५९ तक्रारींची तपासणी पूर्ण झाली असून उर्वरित तक्रारींची तपासणी सुरू आहे. तसेच चिखली तालुक्यातून ४७ बियाण्यांचे नमुने प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत.

दरम्यान, बाधित शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पंचनामे करण्याचे काम सुरू असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळावी यासाठीही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. युवासेना जिल्हाप्रमुख नंदू कराडे यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे सांगितले. तालुका कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) डी. एल. लंबे यांनी बोगस बियाणे विक्री करणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले.

# सोलर ग्राहकांच्या वीजबिल तक्रारीसाठी महावितरण कक्ष

## २५ जुलैपर्यंत तक्रारी नोंदविण्याचे आवाहन

प्रतिनिधी १८ जुलै

**खामगाव :** सोलर ग्राहकांच्या अतिरिक्त वीज बिलाच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत. या तक्रारींवर तोडगा काढण्यासाठी भाजपाचे जिल्हा सचिव संजय शिनगारे यांनी स्थानिक नागरिकांसह महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता देशपांडे यांच्याशी चर्चा केली. या चर्चेतून वीज बिलाच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी आता स्वतंत्र तक्रार कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यासाठी वीज बिलाच्या तक्रारी २५ जुलैपर्यंत कराव्यात, असे आवाहन संजय शिनगारे यांनी केले आहे.

अनेक वीज ग्राहकांपर्यंत स्वतः संजय शिनगारे यांच्याही घरावर सोलर पॅनल आहे. त्यांनाही अतिरिक्त वीज बिल येत आहे. शहरांसह मतदारसंघातील अनेक सोलर ग्राहकांच्या अशातक्रारी असून यासाठी १७ जुलै पासूनच महावितरण कार्यालयात एक स्वतंत्र तक्रार कक्ष सुरु करण्यात आला आहे. अशी माहिती शिनगारे यांनी दिली आहे. ज्या ग्राहकांना सोलर बसविल्यानंतरही अतिरिक्त किंवा वाढी वीज बिल येत आहे. त्यांनी आपल्या लेखी तक्रारी २५ जुलै पर्यंत महावितरण कार्यालयात जमा कराव्यात आणि या लेखी तक्रारीची एक छायांकित प्रत ९४२२१२८५०३ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावी. या सर्व तक्रारीचे निवारण करण्यासाठी महावितरणचे वरिष्ठ अधिकारी आणि विद्युत क्षेत्रातील तंज्ञ व्यक्तींच्या उपस्थितीत एका विशेष बैठकीचे आयोजन केल्या जाणार आहे. या बैठकीत प्रत्येक तक्रारीचे नियमानुसार तपासणी करुन ग्राहकांवर तांत्रिक चुकांमुळे अथवा अन्य कारणांमुळे अन्याय होणार नाही. याची दक्षता घेतली जाईल असेही शिनगारे यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

# एमआयडीसीसाठी आ. खरात यांची अधिकाऱ्यांसोबत बैठक

प्रतिनिधी १८ जुलै

**मेहकर :** पावसाळी अधिवेशनात सभागृहात लक्षवेधीद्वारे मेहकर एम. आय. डीसीचा प्रश्न प्रभावीपणे उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधल्यानंतर आमदार सिद्धार्थ खरात यांनी पुन्हा एकदा मोठी प्रत्यक्ष कृतीला सुरुवात केली आहे. मेहकरच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे १६ जुलै रोजी जनसंवाद कार्यालयात एमआयडीसी संदर्भात संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेऊन प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश त्यांनी दिले. मेहकर येथे नवीन उद्योगधंदे उभे राहून स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने झालेल्या बैठकीत एमआयडीसी परिसरातील उपलब्ध जागा, प्रलंबित अडचणी, आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया तसेच उद्योग उभारणीसाठी आवश्यक उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पावसाळी अधिवेशनात मांडलेल्या लक्षवेधीच्या अनुषंगाने संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून एमआयडीसीच्या कामाला गती द्यावी, अशा स्पष्ट सूचना आमदार खरात यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की, मेहकरचा औद्योगिक विकास हा केवळ विकासाचा विषय नसून स्थानिक युवकांच्या रोजगाराशी निगडित आहे. एमआयडीसी कार्यान्वित झाल्यास नव्या उद्योगांना चालना मिळेल, गुंतवणूक वाढेल आणि परिसराच्या आर्थिक विकासाला नवी दिशा मिळेल. यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असून प्रत्येक अडथळा दूर करण्यासाठी प्रयत्न केले जातील. या बैठकीस एमआयडीसीचे अधिकारी राजेंद्र जाधव, उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, तहसीलदार निलेश मडके, वन विभागाचे रेंज ऑफिसर के. जी. सरनाईक यांच्यासह विविध विभागांचेअधिकारीउपस्थितहोते.

# मामुलवाडीचा प्रारुप निवाडा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडून विभागीय आयुक्तांकडे सादर

प्रतिनिधी १८ जुलै

**निमगाव :** जिगाव प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी मामुलवाडीचे माजी सरपंच प्रमोद शेषराव गावंडे व भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष एकनाथ रामराव गावंडे पाटील यांनी ६ जुलैला उपोषण केले होते. मामुलवाडी गावठाण येथे प्रकल्पग्रस्तांच्या मौजे मामुलवाडी गावठाण मधील घरे वगळलेली आहे. तीघरे गावठाण मध्ये घेण्यात यावे, व जे घरे शेतामधील सोडलेले आहे ते सुद्धा घेण्यात यावे. अशी मागणी केली होती.

खुमगाव बुटी ते पातोंडा पोहोच रस्ता ७०० मीटर आहे. तसेच पातोंडा गावाच्या बाहेरून सुद्धा एक पोच रस्ता करण्यात यावा, नाहीतर या दोन्ही रस्त्याचा कोणत्याच प्रकारचा फायदा नवीन पुनर्वशीत गावांना होणार नाही. गावकऱ्यांचे व शासनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. बांधकामाच्या साहित्याचे व प्लॉटचे शेतीचे भाव वाढत आहे. शेतीला ६ वर्षे पूर्ण होऊन सुद्धा १ रुपयाचा मोबदला मिळाला नाही. जिगाव धरणामध्ये पाणीसुद्धा अडवलेले नाही. पहिले पाणी अडवा व गावांचे व शेतीचे पैसे द्या त्यानंतर पाईपलाईन व काँक्रीटचे रस्ते नंतर करा. तरी बरेच वर्षापासून अमरावती सिंचन विभागात काही अधिकारी तळ ठोकून आहेत. त्यांच्या

ताबडतोब बदल्या करण्यात याव्या. वरील सर्व विषयांची एसआयटी मार्फत चौकशी करण्यात यावी व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व आम्हास न्याय देण्यात यावा. अशा विविध मागण्यांसाठी उपोषण सुरू केले होते. यावेळी ७ जुलै रोजी आमदार चैनसुख संचेती यांनी उपोषण मंडपाला भेट देऊन जिल्हाधिकारी बुलढाणा डॉ. प्रवीण कुमार देवरे यांच्याशी दूरध्वनीवरील संपर्क करून सदर प्रकरण ३ दिवसात अमरावती येथे पाठवण्याचे सकारात्मक आश्वासन दिल्याने आमदार चैनसुख संचेती यांची हस्ते उपोषणकर्त्यांना थंड पेय देऊन सदर उपोषणाची सांगता करण्यात आली होती.

सदर आश्वासनाची पूर्तता म्हणून जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी सदर प्रकल्पग्रस्त मामुलवाडीचा प्रारूप निवाडा ९ जुलै रोजी विभागीय आयुक्त अमरावती यांचेकडे सादर करण्यासाठी पाठवला असून २१ जुलै रोजी सदर प्रकरण हे मुंबई मंत्रालयात जाणार असल्याचे प्रकल्पग्रस्त माजी सरपंच प्रमोद गावंडे व भाजपाचे माजी नांदुरा तालुकाध्यक्ष एकनाथ गावंडे पाटील यांनी सांगितले.

# बियाणे वितरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी; एसडीओंकडे निवेदन

प्रतिनिधी १८ जुलै

**सिंदखेडराजा :** तालुका कृषी कार्यालय,सिंदखेडराजामार्फतसन २०२६ मध्ये विविध योजनांअंतर्गत करण्यात आलेल्या सोयाबीन, उडीद,मूग,मका,तूरमिनीकिटतसेच कपाशी बियाण्यांच्या वितरण प्रक्रियेचीस्वतंत्र,निष्पक्षवसखोल चौकशीकरूनसंपूर्णअभिलेखांची पडताळणी करावी, अशी मागणी करणारे निवेदन उपविभागीय अधिकारी, सिंदखेडराजा यांना देण्यातआलेआहे.

'बियाण्यांचे वितरण ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले असून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली आहे. प्राप्त तक्रारीची स्वतंत्र, निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यात येईल. चौकशीत काही त्रुटी अथवा अनियमितता आढळल्यास नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.'

**रामेश्वर भुते** तालुका कृषी अधिकारी, सिंदखेडराजा

श्रीमंत राजे लखुजीराव जाधवराव गड किल्ले ऐतिहासिक वास्तू संवर्धन प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकृष्ण राजे जाधव यांनी १७ जुलै रोजी हे निवेदन सादर केले. निवेदनानुसार, काही बियाण्यांचे वितरण तालुका कृषी कार्यालयामार्फत, तर काही बियाण्यांचे वितरण आनंद कृषी केंद्र, शेंदूरजन तसेच कृषी क्रांती कृषी केंद्र, देऊळगाव राजा यांच्या माध्यमातून करण्यात आल्याचे नमूदकरण्यातआलेआहे.निवेदनात लाभार्थी यादी, स्टॉक रजिस्टर, वितरण नोंदी, प्राप्ती-वितरण अभिलेख,चलने,पावत्यातसेचइतर संबंधित कागदपत्रांची तपासणी करावी, तसेच लाभार्थ्यांची प्रत्यक्ष क्षेत्रीय पडताळणी करून पात्र लाभार्थ्यांनाच बियाण्यांचा लाभमिळाला आहे का, याची खातरजमा करावी, अशी मागणी करण्यातआलीआहे.

तसेच संपूर्ण बियाणे वितरण प्रक्रियेची स्वतंत्र, निष्पक्ष व सखोल चौकशी करून चौकशीत कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी, कृषी केंद्र, विक्रेते अथवा इतर जबाबदार व्यक्तींवर प्रचलित शासन नियमांनुसार कठोर प्रशासकीय, विभागीय, आर्थिक तसेच आवश्यक असल्यास फौजदारीकारवाईकरण्यातयावी, अशीमागणीहीनिवेदनातकरण्यात आलीआहे.

# जळगावात मातंग समाजाचा आक्रोश मोर्चा

## उपवर्गी करणसह विविध मागण्यांचे निवेदन

प्रतिनिधी १८ जुलै

**जळगाव जामोद:** विविध प्रलंबित मागण्यांसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने शुक्रवारी (दि. १७) जळगाव जामोद येथे आक्रोश मोर्चा काढण्यात आला. संत तुकाराम महाराज चौक ते उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

मोर्चात सकल मातंग समाज समन्वय व संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष संजय बोदडे, आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेश घोडे, लहूजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे, ज्येष्ठ नेते बबनराव बोदडे, शांताराम तायडे, भारतीय लहूजी सेनेचे वामनराव बोरे, क्रांतिगुरू लहूजी विचार मंचाचे वामनराव बोरसे, वामनराव गुडेकर, विजय सानोने लहूजी साळवे स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णा नाटेकर, महादेव ढगे, महेंद्र वानखडे यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते. मोर्चा दरम्यान जळगाव जामोद पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सचिन बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शेडगे व पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला. निवेदन स्वीकारल्यानंतर संबंधित मागण्या शासनाकडे पाठविण्यात येतील, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### अशा आहेत मागण्या

निवेदनात, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करून अ, ब, क व ड प्रवर्गानुसार आरक्षण लागू करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच लहूजी वस्ताद साळवे संघटनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांच्यावर झालेल्या हल्ल्यातील आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली

# केंद्रीय विद्यालयात प्रवेशासाठी पालकांची झुंबड!

## नोंदणी अर्ज घेणे व स्वीकारण्यास सुरूवात, २८ जुलैपर्यंत राहणार मुदत

प्रतिनिधी १८ जुलै

**अकोला :** येथील जुने शहरातील हरिहरपेठच्या जिल्हा परिषद हायस्कूल (शहर) मध्ये तात्पुरत्या स्वरूपात केंद्रीय विद्यालय सुरू करण्यात आले आहे. या विद्यालयात प्रवेशासाठी ऑफलाइन नोंदणीची प्रक्रिया १५ जुलैपासून सुरू झाली असून २८ जुलैपर्यंत दुपारी २.३० वाजेपर्यंत ऑफलाइन अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. त्यामुळे वर्ग पहिले ते पाचवीमध्ये प्रवेश घेण्यास इच्छुकांनी शाळा परिसरात गर्दी केली आहे.

केंद्रीय विद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता १ ली ते ५ वीच्या वर्गातील प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. स्थानिक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी यानिमित्त निर्माण झाली आहे. आपल्या पाल्याला उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी पालक






### असे राहणार प्रवेशाचे वयोगट

- वर्ग पहिली - ६ वर्ष पूर्ण पण ८ वर्षापेक्षा कमी
- वर्ग दुसरी - ७ वर्ष पूर्ण पण ९ वर्षापेक्षा कमी
- वर्ग तिसरी - ८ वर्ष पूर्ण पण १० वर्षापेक्षा कमी
- वर्ग चौथी - ९ वर्ष पूर्ण पण ११ वर्षापेक्षा कमी
- वर्ग पाचवी - १० वर्ष पूर्ण पण १२ वर्षापेक्षा कमी

ऑफलाइन नोंदणीसाठी विद्यालयात गर्दी करीत असल्याचे चित्र शुक्रवारी दिसून आले. या प्रवेशाचा नोंदणी फॉर्म निशुल्क मिळत असून तो सादर करण्यासाठी १५ ते २८ जुलै अशी मुदत (फक्त कामकाजाच्या दिवशी) आहे. फॉर्म स्वीकारण्याची वेळ सकाळी ९ ते दुपारी १२.३० आणि दुपारी १ ते २.३० वाजेपर्यंत राहणार आहे. फॉर्म सादर करण्याची अंतिम तारीख २८ जुलै आहे. प्रवेशाची सोडत ३ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता 'जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला' येथे काढण्यात येईल. निवडलेल्या विद्यार्थ्यांची यादी ३ ऑगस्ट रोजी लॉटरी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केली जाईल. नोंदणी फॉर्म शाळेच्या वेळेत प्राचार्यांच्या कार्यालयात मोफत मिळत असून, पूर्ण भरलेले अर्ज (फॉर्म) आवश्यक कागदपत्रांसह अंतिम तारखेपूर्वी शाळेच्या कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे, असे आवाहन विद्यालयाचे प्राचार्य बालाजी मारकवार यांनी केले आहे.

### वर्ग १ ते ५ वीसाठी प्रवेश सुरूट

केंद्रीय विद्यालयासाठी गुडधी येथे जागा मंजूर करण्यात आली असून, तिथे कायमस्वरूपी इमारत निर्माण होणार आहे. शाळा पहिल्या टप्प्यात इयत्ता १ ली ते ५ वी च्या वर्गांसह (प्रत्येक इयत्तेची एक तुकडी) सुरू केली जात आहे. प्रत्येक वर्गाची प्रवेश क्षमता ४० आहे. विद्यालयाच्या कार्यालयाचे कार्यान्वयन, तांत्रिक बाबींची पूर्तता जलदपणे करण्यात आली असून, प्रवेश नोंदणीला सुरूवात झाली आहे.

# एसटीचा अकोला नागपुर प्रवास 62 रुपयांनी महागला

## राज्य परिवहन महामंडळाची 13% भाडेवाढ



प्रतिनिधी १८ जुलै

**अकोला :** राज्य मार्ग परिवहन महामंडळाने शुक्रवारी मध्यरात्रीपासून प्रवासी भाडेवाढ लागू केली आहे. त्यामुळे अकोला नागपुर चा प्रवास 63 रुपयांनी महागला आहे. जुन्या दरानुसार अकोला नागपुर दरम्यान 433 रुपये तिकीट लागत होते. नव्या दरानुसार 495 रुपये तिकिट प्रवाशांकडून आकारले जाणार आहे. मध्यरात्री १२ नंतर एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून ही भाडेवाढ घेतली जाणार आहे. ही दरवाढ साधी बससेवा, विना वातानुकूलित शयन आसनी व विना वातानुकूलित शयनयान या तीन बससेवांसाठी लागू केली आहे. तसेच प्रवासी आणि वाहक यांच्या सुट्ट्या पैशांमुळे होणारे वाद लक्षात घेता पाच रुपयांच्या पटीत तिकिट दर निश्चित करण्यात आले आहेत आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यामध्ये करण्यात आलेली वाढ, तसेच वाहनांचे सुटे भाग, टायर आणि देखभाल खर्चात झालेली लक्षणीय वाढ यांचा सर्वकष विचार करून हा निर्णय घेण्यात असल्याचा दावा महामंडळाने केला आहे. भाडेवाढ तर केली मात्र प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा भर रस्त्यात एसटी बंद न पडावी एवढीच अपेक्षा प्रवासी व्यक्त करीत आहे.

### साध्या बससाठी नवे दर

| बसचा मार्ग | | |
|---|---|---|
| अकोला नागपूर | ------ | 495 रुपये |
| अकोला पुणे | ----- | 940 रूपये |
| अकोला अमरावती राजापेठ पर्यंत | ---- | 175 |
| अकोला शेगाव | --- | 105 रुपये |
| अकोला वाशिम | --- | 165 रुपये |
| अकोला पंढरपूर | --- | 950 रुपये |

हे फक्त साध्या बसचे दर असून अन्य वातानुकूलित हिरकणी आधी बस चे दर मात्र वेगवेगळे आहेत

# पाण्याचा जपून वापर करा

## आयुक्तांचे शहरवासीयांना आवाहन

प्रतिनिधी १८ जुलै

**अकोला :** यंदा पाऊस उशिरा सुरू झाला.



तसेच काटेपूर्णा प्रकल्पात पाणी पातळी पाहता शहरवासीयांनी उपलब्ध पाणी जपून वापरणे गरजेचे आहे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी केले आहे.

उपलब्ध पाणी शहरवासीयांना उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. परंतु चांगला पाऊस होऊन जलाशयात मुबलक जलसंचय होईपर्यंत पाणी जपून वापरण्याशिवाय पर्याय नाही असे देखील डॉ. सुनील लहाने म्हणाले.

# पातूर तालुक्यात अवैध दारुविक्रीविरोधात महिलांचा मोर्चा; कारवाई न झाल्यास बेमुदत धरण्याचा इशारा

प्रतिनिधी १८ जुलै

**पातूर :** तालुक्यातील चान्नी पोलिस स्टेशनच्या हद्दीतील कुंभारवाडी, नवेगाव सावरगाव, झरंडी, आलेगाव, पाडसिंगी आणि उंबरवाडी परिसरात अवैध दारू विक्री वाढल्याचा आरोप करत गावातील महिलांनी मोर्चा काढून तीव्र आंदोलन छेडले. सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच चान्नी पोलीस ठाण्यात निवेदन देत अवैध दारू विक्री तात्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली. संबंधित दारूविक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा चान्नी पोलीस ठाण्यासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल आणि मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशारा देण्यात आला. या आंदोलनानंतर प्रशासन कोणती पावले उचलते आणि अवैध दारू विक्रीवर कितपत आळा बसतो, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.



# अकोल्यात पावसाची ओढ; पिके करपू लागली शेतकऱ्यांचे आभाळाकडे डोळे

प्रतिनिधी १८ जुलै

अकोला : जिल्ह्यात अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने बळीराजाची चिंता वाढली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी केवळ ४८ टक्के पावसाची नोंद झाली असून जुलैचा तिसरा आठवडा संपत आला तरी अनेक भाग कोरडेच आहेत. दरम्यान, पावसाअभावी पिके सुकू लागली असून अनेक ठिकाणी पेरणीनंतर उगवण न झाल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. तर दुसरीकडे, उगवलेली पिकेही करपू लागल्याने आर्थिक अडचणी वाढल्या आहेत. दरम्यान, बाळापूर तालुक्यातील रिधोरा येथे काही शेतकरी स्प्रिंकलरच्या साहाय्याने पिकांना पाणी देत आहेत. मात्र हे पाणी अपुरे पडत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.



# शाळकरी मुलांना जीवे मारण्याची धमकी देत 16 हजार रुपये लुटले !

## मलकापूर पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल !

प्रतिनिधी १८ जुलै

**मलकापूर :** शिकवणीचे शुल्क भरण्यासाठी दिलेले १६ हजार रुपये शाळकरी मुलांना जीवे मारण्याची धमकी देत हिसकावून घेतल्याची घटना शहरातील अहमदशाहपूरा परिसरातील अहमदिया मशिदी जवळ बुधवारी रात्री साडेआठच्या सुमारास घडली. याप्रकरणी शहर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अहमदशाहपूरा येथील सय्यद अलीयार सय्यद सुलतान (३८) हे बुधवारी नंदुरबार येथे जाणार होते. त्यामुळे त्यांनी शाळकरी मुलांना शिकवणीचे शुल्क भरण्यासाठी १६ हजार रुपये दिले होते. पैसे घेऊन मुले घरी जात असताना अहमदिया मशिदीजवळ दोन जणांनी त्यांना अडविले.

यावेळी एका आरोपीने मुलांना जीवे मारण्याची धमकी देत पकडून ठेवले, तर दुसऱ्या आरोपीने एका मुलाच्या खिशातील १६ हजार रुपये हिसकावून घेतले. मुलांनी आरडाओरड केल्यानंतर परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. नागरिकांनी आरोपींना पकडण्याचा प्रयत्न केला; मात्र दोघेही तेथून पसार झाले. याप्रकरणी सय्यद अलीयार सय्यद सुलतान यांच्या फिर्यादीवरून शेख हाफीज शेख रशीद उर्फ जाधव आणि मो. रेहान शेख बुडन उर्फ रिजवान बिल्डर (दोघेही रा. हाश्मीनगर, मलकापूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(४), १२६(२), ३५१ (२) आणि ३(५) अन्वये शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलिस निरीक्षक गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक प्रशांत झेडगे करीत आहेत. या घटनेमुळे परिसरातील पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# ट्रेलरमुळे शिवनी विमानतळ रोडवर जॅम



प्रतिनिधी १८ जुलै

अकोला : शिवनी विमानतळ समोर रस्ता अरूंद आहे.

सध्या या ठिकाणी उड्डाणपुलाचे काम सुरू असल्याने नागपूरकडे जाणारी वाहने येथूनच जातात. शनिवारी सकाळी नागपूरकडे जाणारा ट्रेलर अडकून पडला.

त्यामुळे वाहनांचा खोळंबा झाला. यामुळे वाहतूक खोळंबली होती. ब-याच उशिरा मार्ग मोकळा झाला. अजस्त्र वाहन तेथून काढण्यासाठी वाहन चालकाला कसरत करावी लागली.

# स्टोन क्रेशरच्या धुळीमुळे 60-70 एकरांतील पिके धोक्यात, सुपीकता नष्ट होण्याच्या मार्गावर

प्रतिनिधी १८ जुलै

**अकोला :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोरील संकटांची मालिका संपण्याचे नाव घेत नाही आहे. आधीच बोगस बियाण्यांच्या सुलतानी संकटामुळे हवालदील झालेल्या शेतकऱ्यांसमोर आता एका स्टोन क्रेशरमुळे नवे संकट उभे ठाकले आहे. जिल्ह्यातील बोरगाव मंजू येथील सोनाळा रस्त्यावरील एका स्टोन क्रेशरमधून उडणाऱ्या धुळीमुळे परिसरातील ६० ते ७० एकर शेतातील पिके धोक्यात आली आहेत. स्टोन क्रेशरमध्ये अहोरात्र दगड फोडण्याचे काम चालते. या प्रक्रियेतून निर्माण होणारी धूळ आणि माती थेट आजूबाजूच्या शेतांमध्ये जाऊन साचत आहे. यामुळे कधीकाळी हिरवीगार दिसणारी पिके आता पूर्णपणे पांढरी पडली आहेत. धुळीचे जाड थर पिकांच्या पानांवर साचल्यामुळे झाडांना आवश्यक असलेला सूर्यप्रकाश मिळेनासा झाला आहे. प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया थांबल्यामुळे पिकांना फुले येत नाहीत आणि फळेही लागत नाहीत. परिणामी, हाता तोंडाशी आलेला घास हिरावला जात असून पिके पूर्णपणे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. या प्रदुषणामुळे केवळ चालू हंगामातील पिकांचेच नुकसान होत नाही, तर जमिनीचा पोतही कमालीचा बिघडत आहे. शेतात सातत्याने दगड-धोंड्यांची बारीक धूळ साचत असल्याने मातीची नैसर्गिक सुपीकता आणि कस पूर्णपणे नष्ट होत चालला आहे. भविष्यात ही जमीन नापीक होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. या त्रासाविरोधात त्रस्त शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. मात्र, त्याचा परिणाम दिसत नाही. गोपाल माळोकार, राजेश गवळी, रवींद्र राहे या बोरगाव मंजू येथील शेतकऱ्यांनी या प्रकाराकडे लक्ष वेधले आहे.



# श्री हनुमान गढी नरेशच्या चमत्काराने उद्धव ठाकरे यांना सदबुद्धी

प्रतिनिधी १८ जुलै

**अमरावती :** श्री.हनुमान गढी नरेशच्या चमत्काराने उद्धव ठाकरे यांना श्री.रामरक्षा व श्री.हनुमान चालिसा पठण करण्याची सद्बुद्धी आल्याबद्दल दि.18 जुलै दुपारी 2.00 वाजता भाजपा नेत्या माजी खा.नवनित राणा श्री.हनुमान गढी येथे हनुमान चालिसा पठण करणार आहे. उद्धव ठाकरे यांना अहंकाराची मिळाली शिक्षा....आता आठवली रामरक्षा असा आरोप नवनीत राणा यांनी केला आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे विचार सोडल्याने सत्ता गेली, पक्षही गेला, आमदार गेले, खासदार गेले असेही नवनित राणा म्हणाल्या.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी श्रीरामरक्षा व श्रीहनुमान चालीसा पठण करण्यास सुरुवात केल्याच्या पार्श्वभूमीवर भाजपा नेत्या तथा माजी खासदार मा. नवनित राणा यांनी त्यावर प्रतिक्रिया देत, "श्रीहनुमान गढी नरेशच्या कृपेने उद्धव ठाकरे यांना श्रीरामरक्षा व श्रीहनुमान चालीसा पठण करण्याची सद्बुद्धी मिळाली आहे," असे वक्तव्य केले. त्या पुढे म्हणाल्या की, "ज्यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे विचार सोडले, त्यांना जनतेने वेळोवेळी धडा शिकविला. सत्ता गेली, पक्षात मोठी फूट पडली, अनेक आमदार व खासदारांनी साथ सोडली. ही अहंकाराची शिक्षा असून आता श्रीरामरक्षा आणि श्रीहनुमान चालीसाचे महत्त्व त्यांना उमगले आहे." माजी नवनित राणा यांनी सांगितले की, श्री. हनुमानाच्या कृपेने प्रत्येकाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडू शकते. श्रद्धा, भक्ती आणि राष्ट्रभक्तीचा संदेश समाजात पोहोचावा, तसेच सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना व्हावी या उद्देशाने दि. 18 जुलै 2026 रोजी दुपारी 2.00 वाजता श्रीहनुमान गढी येथे श्रीहनुमान चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले आहे. या पठणात त्या स्वतः सहभागी होणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी त्यांनी पुन्हा एकदा बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्ववादी विचारांचा उल्लेख करत, समाजहित, राष्ट्रहित आणि सनातन संस्कृतीच्या जपणुकीसाठी प्रत्येकाने श्रीराम व श्रीहनुमानाच्या आदर्शांचे अनुसरण करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमास भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, श्रीहनुमान भक्त तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### नवनीत राणा व रवी राणा यांचे वक्तव्य






हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135